

# श्री साईलीला

किं. ५० न. पैसे १९६१

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं

चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

माणसाचें मन अत्यंत उच्छृंखल आहे. तें सदासर्वकाळ सैरावैरा धांवत पळत असतें. त्याला वेसण घालून तें स्थीर करण्याचे आपण प्रयत्न केले पाहिजेत. माशी पहाना ! ती प्रत्येक वस्तूवर बसेल परंतु जेथें अग्नी आहे त्याच्या-जवळ जाणार नाहीं. ती तेथून मागें फिरेल. त्याचप्रमाणें मनाचें आहे. तें मोठें रंगेल आहे. तें सर्वत्र रममाण होईल परंतु जेथें अध्यात्मासंबंधीं देवासंबंधीं वार्ता चालल्या असतील, जेथें हरीकीर्तन चाललें आहे, तेथें तें रमणार नाहीं—तेथून दूर पळेल. मनाची वृत्तीच आहे अशी. आपण ती ओळखली पाहिजे. हें ओढाळ मन ईश्वर चरणीं लीन होणार नाहीं हें जाणून व त्याशिवाय आपला तरणोपाय नाहीं, त्याविना आपल्या वाट्याला आलेला जन्म मरणाचा फेरा चुकणार नाहीं, याची खूणगांठ बांधून मनावर सदैव पहारा ठेविला पाहिजे. त्याला कुठेंहि बहकूं देतां कामा नये.

— श्रीसाईसच्चरित


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३९ वें ] मे १९६१ [ अंक २ रा

: संपादक :

गो. वि. क्षीरसागर

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' व्हिन्सेंट रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

शुद्ध भाव असल्याशिवाय सर्व यातायाती व उपचार व्यर्थ आहेत. आम्ही देवभक्ति करतों, वाचन करतों, भजन पूजन करतों, परंतु त्यांत आमचें अंतःकरण असतें का ? आपलें अंतःकरण गुंतलेलें असतें दुसऱ्या कशांत तरी. आम्हांला आमचा स्वार्थ साधायचा असतो. साईबाबांची आपणाला आठवण होते ती संकटकाळीं; जेव्हां आपला कांहीं तरी हेतू साध्य करवयाचा असतो तेव्हां होतें आम्हांला साईबाबांचें स्मरण, मग आपण नवस सायास करूं लागतों; मग जीव कासावीस होतो. परंतु तीच जर आपली भक्ति निर्मळ असेल, मनापासून जर आपण बाबांना आळविलें तर ते संकटसमयीं आपणास मुक्त केल्याशिवाय रहाणार नाहींत. बाबा भावाचे भुकेले आहेत. त्या भावभक्तीचें प्रदर्शन व्हायला नको. ती अंतःकरणापासून असावी. त्याचप्रमाणें झालें आपलें काम, आतां रामराम ! असा प्रकार होऊं नये. बाबा निश्चितपणें पावतात. भक्ताच्या हांकेला ओ देतात. व आपल्या भक्ताचे मनोरथ पूर्ण करतात. परंतु प्रत्येक भक्तानें एक गोष्ट नेहमीं लक्षांत बाळगिली पाहिजे कीं, बाबाना दिखाऊ भक्ती नको. भक्तीचें प्रदर्शन नको. भक्तीचा बाजार नको. भावपूर्ण भक्ति पाहिजे. ती तुम्ही बाबांना द्या. पुष्पहार अर्पण करा; आणखी कांहीं अर्पण करा; शक्तिप्रमाणें जें द्यावेंसें वाटेल तें द्या परंतु त्याच्यामागें तुमची शुद्ध भावना, भावुकता पाहिजे. जो भक्त भावपूर्णतेनें कोणतीही गोष्ट करतो तिच्यावर देव राजी होतो हा आजवरचा सर्व भक्तांचा अनुभव आहे.

आणि साईबाबांनीं आपल्या भक्तांना आश्वासनपूर्वक सांगून ठेविलें आहे कीं, 'तुम्ही कोणी कुठेंहि असा । भावें मजपुढें पसरितां पसा । मी तुमचिया भावासरिसा । रात्रंदिस उभाच ॥'

बाबांची ही वाणी त्रिवार सत्य आहे. ती केव्हांहि खोटी पडणार नाहीं. आपल्या भक्तांच्या कल्याणासाठीं त्यांनीं हा महामंत्र देऊन ठेविला आहे; तो आचरणांत आणण्यासाठीं मनोभावें झटणें यांतच भक्तांचें कल्याण आहे.

—संपादक.




पुढील कांहीं अनुभव जुन्या काळांतील म्हणजे श्रीसाईबाबांच्या हयातींतील आहेत. काळ १९०५ ते १९१२ पर्यंतचा. हे अनुभव श्रीमती काशीबाई कानिटकर यांनीं सांगून ते त्यांची स्नुषा सौ. रमाबाई कानिटकर यानीं लिहून काढल्या आहेत:—

## बाबा कीं अक्कलकोटचे स्वामी महाराज

१९०५ सालीं आम्हीं येवल्यास असतांना, आम्हांस शिरडीस साधुदर्शनाचें बोलावणें जुन्या ओळखीच्या मंडळींनीं केलें. थोड्या दिवसांनीं एक कार्ड—साईंबाचा बाबांचा फोटो टेबलावर होता; कोणी आणून दिला तें ठाऊक नाहीं; अजूनपर्यंत तो माझ्याजवळ आहे. बोलावणें केलें, तेव्हां आम्ही फारसें लक्ष दिलेंच नव्हतें. परंतु जानेवारी अखेर, नगर, सोलापूर व धुळें ह्या तीन जिल्ह्यांच्या शेतकरी कायद्यान्वयें स्पेशल फर्स्टक्लास सब—जज्ज ह्या जागेवर ॲक्टिंग नेमणूक झाली. त्या कामानिमित्त पहिल्यांदा नगर जिल्ह्यांत फिरण्याचें ठरवलें. त्याअन्वयें नगर, कर्जत वगैरे ठिकाणचीं दप्तरें तपासून मुक्काम कोपरगावांवर गेला. कोपरगांवाहून शिरडी जवळ आहे. कोपरगांवचा मुक्काम हालून रहात्याला जावयाचा होता; तेव्हां मीं म्हटलें, 'तुम्हीं दप्तर तपासावयास रहात्यास जावें, व आम्हीं आपला मुक्काम शिरडीस ठेवावा.' त्याप्रमाणें आम्हीं शिरडीस गेलों. जातांना वाटेंत माझ्या मनांत असें आलें कीं, मीं लहानपणीं श्रीअक्कलकोट स्वामीमहाराजांना पाहिलें होतें; त्यांच्यासारखे बाबा दिसले, तर माझी त्यांच्या पदीं भक्ति बसेल आम्हीं शिरडीस जाऊन पोहोंचलों; स्वैपाक, जेवणखाणाचें सामान चावडींत ठेवलें व हपिसाचें व निजण्याबसण्याचें सामान मुलांच्या शाळेंत वेशीबाहेर ठेविलें. नंतर मशिदींत जाऊन बाबांचें दर्शन घेतलें, आणि त्यांच्या हातावर आम्हीं सर्वांनीं अर्धा अर्धा आणा ठेविला. त्या वेळेला ते अर्ध्या आण्याच्यावर दक्षिणा घेत नसत. नंतर आम्ही परत आलों व चावडीवर चहा वगैरे घेत असतां बाबा परत येत होते; येते वेळीं आम्हीं पुन्हां पायां पडलों व माझ्या धाकट्या मुलानें त्यांना चहा घालावयास नेलें. त्यांनीं विचारलें "काय आहे?" चहा आहे म्हटल्यावर नको म्हणाले, मग आम्हीं सर्वांनीं चहा वगैरे घेतल्यावर मग माझा मोठा मुलगा चि. माधवराव व जांवई चि. गंगाधरपंत हे दोघेजण पुन्हां दर्शनास गेले. त्या वेळीं बाबा एकटेच मशिदींत न्याहारी करीत बसले होते, माधव व गंगाधरपंत मशिदीच्या दारापासून पाहतां बाबा न दिसतां स्वामीमहाराज दिसूं लागले, पायरीवर पाय ठेवीपर्यंत तसे दिसत होते.

कर जाण्याकरितां पायरीवर पाय ठेवितांच, स्वामीमहाराज नाहींसे होऊन बाबा दिसूं लागले. मला मात्र स्वामीमहाराज दिसले नाहींत.

**पैसे परत केले**

आमचा मुक्काम तेथें असतांना, एक दिवसाआड बाबा म्हाळसापतीसह चावडींत निजावयास येत असत; त्याप्रमाणें एक रात्रीं ते आले. पहिल्यांदा चावडींत बसून म्हाळसापतीशीं चांगलें बोलत होते; चिलीम भरण्याच्या वेळेस त्यांच्या चिलमीचा खडा खालीं पडला, तें निमित्त होऊन ते अतोनात शिव्या देऊं लागले. त्या शिव्या बायकामाणसांनीं ऐकूं नयेत अशा देखील होत्या. आम्ही उभयतां व आमच्या मुलीबाळी तेथेंच होतों. त्या शिव्या ऐकून आम्हां सर्वांना तेथून जाण्यास सांगितलें. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं, शाळेच्या मागल्या बाजूला रात्रीं गोष्टी सांगत बसले असतां, स्वतः म्हणाले, ' एवढे मोठे साधु म्हणवतात, आणि घाणेरड्या शिव्या काय काय बोबा देतात ? ' तेव्हां शिरस्तेदार व इतर मंडळी म्हणाली, ' साधूंना शिव्या व इतर बोलणीं सारखींच ! त्यांना त्याचें काय !! ' स्वतः म्हणाले ' आपल्याला नाहीं बोवा तें कळत; त्यांनीं जर आम्हीं आल्यापासून दिलेले पैसे आपणहून परत दिले, तर आपण त्यांना साधू म्हणूं.' दुसऱ्या दिवशीं आम्हीं सर्व कोपरगांवास जावयास निघालों. कारकून, शिपाई, कोळीफ वगैरे पैसे देऊन जाण्यास निघालों; ते सर्व पैसे घेऊन बाबांनीं बसावयाच्या तरटाखालीं ठेवले. नंतर स्वतः दर्शनाला गेले, त्यावेळीं त्यांनीं तें सर्व पैसे गोळा करून त्यांना दिले व म्हणाले कीं, "हे घे आपले सर्व पैसे." नंतर आम्हीं सर्व पांच-सातजणी बायका, विचारण्यास जावयास निघालों; माझ्याजवळ त्या वेळेस सर्वांना अर्धा अर्धा आणा देण्यास सुटे पैसे नव्हते. म्हणून कुणाला आणा, कुणाला अर्धा आणा, कुणाला दोन आणे, असे दिले. तेव्हां माझी मुलगी म्हणाली, "असे काय देतेस, सर्वांना सारखे दे; कुणाला कमी कुणाला जास्ती असे कां देतेस ?" तेव्हां मीं म्हटलें, "अग, आपण आज चार दिवस नाहीं का दिले; आतां माझ्याजवळ सुटे नाहींत; जें हाताला लागेल तें द्या आणि चला." बाबांनीं स्वतःच्या हातावर पैसे ठेविले तेव्हां त्यांनीं मला बोलावणें पाठविलें व मला सांगितलें, "बाबा पैसे घेत नाहींत, हे सब सर्व त्यांनीं परत दिले." मी गेल्यावर बाबांना म्हटलें, "धुनीच्या लांकडांला पैसे नकोत का ! परत कां देतां !" तेव्हां बाबा मला म्हणाले, "अग, आज चार दिवस नाहीं का दिले ! जसे असतील तसे द्यावे." हे शब्द मीं मुलीला म्हटले होते. ते माझे मला परत केले व पैसेही परत केले. आमची व मुलींची भाषा झाली, ती चावडींत झाली, व त्यांचीं शाळेंत झालेलीं बोलणीं, अन्तरसाक्षी बाबांनीं मशिदींत बसून त्यांचीं उत्तरें दिलीं.

**उठा ! मशीद रिकामी करा**

एकदा आम्हीं येवल्याहून सकाळच्या गाडीनें, शिरडीस जाण्याकरितां कोपरगांवी घाटावरील दत्तमंदिरांत थोडा वेळ थांबलों होतों. आमच्याबरोबर पुरुषमाणूस, एक

नोकराशिवाय कोणी नव्हतें. ब्रह्मचारीबोवांच्या तिथें सामानसुमान ठेवून, श्रीगोदावरीच्या स्नानास मुलांबाळांसह गेलों. स्नान करून आल्यावर देवदर्शन, मुलांचे फराळ आमचा चहा वगैरे आटोपून शिरडीस जाण्यास निघालों. शिर्डीच्या अर्ध्या वाटेंत टांगे गेले, तोंच शिरडीहून एक टांगा आला; तो टांगा थांबवून व आमच्या टांग्याला थांबवून ते दोन गृहस्थ खाली उतरून म्हणाले, "तुम्हीं लवकर जा, तुमच्यासाठीं बाबांनीं आम्हांला तेथें बसूं-बोलूं दिलें नाहीं. त्यांनीं आम्हांस सांगितलें, "उठा इथून ! मशीद रिकामी करा. आई येती आहे, तिच्या लेकरांबाळांना आणि माणसांना बसावयास जागा पाहिजे आहे." आम्हीं शिरडीस जाण्यापूर्वी कोणासही कळविलें नव्हतें, आणि ते गृहस्थही आमच्या ओळखीचे नव्हते. पण आम्हीं व ते एकाच गाडीनें कोपरगांवच्या स्टेशनवर उतरलों होतों; ते थेट गेले व आम्हीं स्नानाला थांबलों. त्यांच्याच सांगण्यावरून ते फौजदार होते व मनमाडहून आले होते असें समजलें.

**पायरी चढूं नका.**

१९०६ सालीं आमच्याबरोबर गोदूबाई गोखले नांवाच्या आमच्या आप्तसंबंधी बाई आल्या होत्या. आम्हीं शिर्डींत उतरल्यावर दर्शनास गेलों. आम्हां सर्वांस मशिदींत येऊं दिलें, पण गोदूबाई गोखले ह्यांना बाबा मशिदीची पायरी चढूं देईनात. ते त्या बाईला म्हणत, 'माझ्या मशिदीला शिवू नकोस, विटाळ होईल.' त्या बाई एवढेसें तोंड करून परत गेल्या ! त्या विहिरीवर जाऊन लुगडें धुवून, स्नान करून लुगडें वाळवून नेसून परत आल्या, व पुन्हां मशिदींत गेल्या; तरी बाबा त्यांना पायरी चढूं देईनात. पहिल्यांदा त्यांना वाटलें, वाटेच्या गाडीच्या विटाळाची, म्हणून बाबांनीं मशिदींत येऊं दिली नसेल; म्हणून त्या स्नान करून आल्या; तरी पुन्हां तेंच ! शेवटीं त्या परत जाण्यास निघाल्या; म्हणून शेवटीं तरी बाबा दर्शन देतील म्हणून त्या मशिदींत गेल्या. तरी बाबांनीं त्यांना येऊं दिल्या नाहींत; शेवटीं निराश होऊन त्या येवल्यांत परत गेल्या. घरीं गेल्यानंतर त्यांचा चुलत दीर किंवा जाऊ वारल्याचें पत्र आलेलें होतें, तें कळलें; ह्याचसाठीं बाबांनीं आपणांस मशिदीस शिवूं दिलें नाहीं, हें समजून बाबांच्या अन्तर्साक्षित्वाची खूण पटली.

**नाशिकचीं द्राक्षें**

एकदां नाशिककडून चांगली उत्तम द्राक्षे आणविली होती; तीं घेऊन मी शिर्डीस गेलें; बरोबर दोघी मुली, दोघी नाती व धाकटा मुलगा होता. आम्हीं जाऊन पोहोंचलों, तेव्हां बारा-एकाचा सुमार होता. मशिदींत गेलों, तेव्हां बाबा धुनीशेजारील खांबास टेकून बसले होते; आम्हीं वर जाऊन बाबांच्या पायावर डोकें ठेऊन, दक्षिणा देऊन, बाबांच्याभोंवती बसलों; द्राक्षांची करंडी बाबांच्या पुढें मीं केली; बाबांनीं झांकण उघडून बघितलें व "काय अंगुर आणलेस हो !" असें ते म्हणाले. मीं म्हटलें. "तुमच्याकरितां नाशिकहून आणलीं." त्यांनीं द्राक्षांचें घड उलथेपालथे करून, सगळी करंडी माझ्याकडे लोटली व म्हणाले, "जा, घे आपली !" तें ऐकून मला फार वाईट वाटलें. नंतर बाबांना काय वाटलें कुणास ठाऊक, त्यांनीं पुन्हां ती करंडी

आपल्याजवळ घेऊन त्यातील सुकलेली, वाळलेलीं, अशीं चारपांच द्राक्षें आपल्या पितळींत घेऊन, "जा आतां तुझीं लेकरंबाळं खाऊ देत." दर्शन, उदी, प्रसाद घेऊन आम्हीं मशिदीबाहेर आल्यावर, बनूताई (माझी मुलगी) म्हणाली, 'कुठून बाई माझ्या मनांत आलें कोण जाणें!' मी विचारलें, 'काय तुझ्या मनांत आलें?' ती म्हणाली, 'तूं जेव्हां सबंध करंडी त्यांच्यापुढें ठेविलीस, तेव्हां माझ्या मनांत आले, हीं सबंध द्राक्षें उगीच हिनें ह्यांना दिली! हे आतां सगळी द्राक्षें उधळून देतील; आपल्या मुलांबाळांना नाहीं व त्यांनाहि नाहीं असें होईल.' म्हणून त्यांनीं करंडी परत केली; माझ्या मनाला फार वाईट वाटलें म्हणून त्यांतील चार कसलीं बसलीं द्राक्षें काढून घेतली. कोणतीहि गोष्ट मनांत आणली तरी बाबांना तात्काळ कळत असे.

**कलमी आंब्यांची गोष्ट**

१९०९ सालीं शिरडीला गेले होते; तिथें दोन तीन दिवस मुक्काम होता. त्या तीन दिवसांत एकदां तिसऱ्या प्रहरच्या वेळीं, बाबांनीं आपल्या पायापाशीं मला बसवून घेतली; तेहि धुनीच्या समोरच्या खणांत जोत्यावर बसले होते. बाबाजी गणेश देशपांडे ह्यांची मथुबाई पाठ चेपीत होती, आजूबाजूला आणखी कांहीं बाया बसलेल्या होत्या, मी पायांपाशीं बसलें, तेव्हां मला बाबांनीं विचारलें, "तुला कोपरगांवच्या दत्तानें कांहीं दिलें का ग?" मला तो प्रश्न कांहींच समजेना! मी त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागलें. तेव्हां ते मला म्हणाले, "तुला अनगांवकवाडचा सखाराम माहित आहे का?" तेव्हां मीं उत्तर केलें, "ऐकून माहित आहे." तेव्हां बाबा म्हणाले, "सखाराम व मी गुरुबंधु होतों; आम्हीं एकाच गुरुपाशीं पढत होतों. गुरूच्या मठांत आम्हीं दोघांनीं आपल्या हातांनीं आंब्यांचीं झाडें लाविलीं, त्या आंब्याची दोन फळं, काल तुला कोपरगांवी पाठविलीं." त्यानंतर मी कोपरगांवला परत आलें तेव्हां कोपरगांवच्या ब्रह्मचारीबोवांनीं, मला दोन कलमी आंबे देऊन सांगितलें की, हे दोन आंबे बाबांनीं तुम्हांकरितां पाठविले आहेत. त्यावरून बाबांचे गुरुबंधु सखारामबुवा कवाडकर होते, हे कळून आलें.

**शंभर रुपयाची गोष्ट—**

श्रीमती सुमतीबाई गुप्ते, नं. दा. गुप्ते, ४ बोरील हाऊस वुडहाऊस रोड, मुंबई नं. १ या लिहितात कीं,

एकोणीसशें सत्तावन सालची गोष्ट आहे. त्यावेळेस ह्यांची प्रकृती अचानक बिघडल्यामुळें आम्ही दोघे बडोद्यास माझ्या भावाच्या घरीं होतों. माझा मुलगा प्रवीण आपल्या आजारी वडिलांना भेटण्याकरितां आठ दिवसांची रजा घेऊन आजोळीं आला, त्यावेळेस तो बोटीवर चीफ ऑफीसरच्या जागेवर होता. जवळ जवळ सात आठ वर्षांनें बडोद्यास आला होता. त्याची बाबांच्यावर पहिल्यापासून अढळ श्रद्धा आहे. बडोद्यास आल्यानंतर त्यानें शिंप्याकडे गरमसूट शिवण्यास टाकला. शिंप्यानें सांगितलेल्या दिवशीं तो आपल्या बरोबरीच्या दोन मावस्यांसह शिंप्याकडे जाण्यास निघाला. जातांना सुटाची

शिलाई देण्यासाठीं म्हणून त्यानें माझ्या जवळून शंभर रुपयांची एक नोट घेतली व घाईघाईत निष्काळजीपणानें ती पँटच्या खिशांत कोंबिली.

ती संध्याकाळची वेळ होती व तो गुरुवार होता. काळोख पडला होता व सोसाट्याचा वाराही सुटला होता. तीं तिघे ज्या रस्त्यावरून जात होतीं तो राजमहालरोड डांबरी व स्वच्छ होता. घरापासून अर्धे अंतर चालून गेल्यानंतर प्रवीणनें सहज पँटच्या खिशांत हात घातला व तो एकदम दचकला. कारण ती शंभराची नोट कोठेंतरी पडून गेली होती. त्या तिघांनीं मागे फिरून फिरून रस्त्यावरील कागदाचे कपटे, तुकडे चांचपडून पाहिले. पण वारा जोराचा असल्यामुळें रस्त्यावर पडलेले कागद एके ठिकाणी ठरत नव्हते. शेवटचा उपाय म्हणून दोघी मावशांनीं घरीं जावून बॅटरी आणण्याचें ठरविलें. व त्या घरीं आल्या. प्रवीणहि नोट शोधत शोधत घराकडे येवूं लागला. मनांत तो साईबाबांचें नांव घेत होता. इतक्यात समोरून एक फाटके कळकट कपडे घातलेला वयस्क म्हातारा मनाचे श्लोक म्हणत आला व त्यानें प्रवीणला इंग्रजींत विचारले 'what is the time now?' प्रवीणनें हलक्या आवाजांत सांगीतले It is 8 O'clock.

तो म्हातारा म्हणाला, 'मला कमी दिसतें व ऐकूही कमी येतें. तेव्हां जरा मोठ्यानें सांगा.' प्रविणने मोठ्या आवाजांत त्याला वेळ सांगितली. तेव्हां तो म्हातारा म्हणाला, 'अहो मी तुम्हाला तर चांगलाच ओळखतों.'

प्रवीण आश्चर्यानें म्हणाला, 'हें कसें शक्य आहे? मी बोटीवर असतों व जवळ जवळ आठ वर्षां नंतर आता मी आजोळीं आलों.'

पण तो वृद्ध आपला हेका सोडीना.

'नाहीं कस! मी तुम्हाला ओळखतों.' हे सर्व संभाषण चालू असतां प्रवीणचे लक्ष मात्र खालीं रस्त्याकडे नोट शोधण्यांत गुंतलें होतें. त्यामुळें त्या गृहस्थांना 'नांव, गांव कोण कुठले' इत्यादी चौकशी करण्यासही प्रवीणला सुचलें नाहीं.

तो वृद्ध प्रवीणला विचारूं लागला "काय हो, तुमचें कांहीं हरवलें आहे काय! तुम्हीं काय शोधीत आहांत?"

प्रवीणनें नोट हरविल्याचे सांगितलें, तेव्हां तो म्हातारा म्हणाला. "अहो नोट कुठे जाणार? ती तुमच्या पायांजवळच असेल, बघा."

प्रवीणनें झटकन खालीं वाकून पाहिलें आणि काय आश्चर्य! त्याच्या पायाजवळ नोट दिसली. तो ती घेण्यास वांकला तोपर्यंत तीं अज्ञात व्यक्ती मनाचे श्लोक म्हणत म्हणत झपाट्यानें निघूनही गेली. प्रवीणच्या मनांत विचारांचे काहूर उठलें.

ज्या रस्त्यावरील कागदाचा तुकडानतुकडा मी चांचपडून पाहिला तिथेंच ह्या अधु डोळ्याच्या वृद्धाला नोट कशी दिसली! त्याच्या फाटक्या कपड्यांवरून त्याला पैशाची जरूरी होती हे निश्चीत! पण पैसे मला देऊन, आभार मानण्याची संधीही न देतां एका सेकंदांत अदृश्य होणारा हा महात्मा तरी कोण होता! बाबांची मी मनोमन प्रार्थना केली तेव्हां त्यांच्याशिवाय दुसरे कोण मदतीला येणार, असें मला वाटलें.

---

# श्रीरामनवमी उत्सवाचा सोहळा

(आमच्या प्रतिनिधीकडून)

शिरडी येथें श्रीसाईबाबांच्या प्रेरणेनें त्यांच्या हयातींत सुरू झालेला व ह. भ. प. श्रीदासगणूमहाराज यांच्या वतीनें प्रतिवर्षी होणारा श्रीरामनवमी जयंत्युत्सव शुक्रवार, शनिवार व रविवार ता. २४, २५ व २६ मार्च रोजीं अत्यंत यशस्वी रीतीनें पार पडला. या उत्सवानिमित्त भरणाऱ्या यात्रेसाठीं, विविध कार्यक्रमांत भाग घेण्यासाठीं व श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठीं हजारो स्त्रीपुरुषांचा जमाव एकत्र जमा होत असतो. सतत चार दिवस शिरडी क्षेत्र जनसंमर्दानें दुमदुमून जात असतें. दर वर्षांपेक्षां या उत्सवास हजर राहिलेल्या यात्रेकरूंची संख्या जास्त होती. एवढ्या लोकांच्या खाण्यापिण्याची, स्नानाची व आरोग्यरक्षणाची व्यवस्था योग्यप्रकारें ठेवणें ही साधी गोष्ट नव्हती. लोकांची गर्दी जमा होते तेथें चोरांची, खिसेकापूंची व संधीसाधू लोकांची चांगली चंगळ होत असते. स्वार्थ साधण्याचा हाच तर त्यांचा हंगाम असतो. परंतु पोलिस, होमगार्ड व स्वयंसेवक यांची सेना तशा प्रसंगीं तोंड देण्यासाठीं अत्यंत सावधगिरीनें सज राहिली होती. पोलिस व होमगार्ड मिळून पाऊणसें लोक बंदोबस्ताचें कार्य रात्रंदिवस दक्षतेनें पार पाडण्यासाठीं झटत होते. त्यांना दोन स्त्रीपोलिसांचाही सहकार लाभलेला होता. चोरीचे व खिसेकापूचे प्रकार घडले नाहींत असें नाहीं; परंतु दक्षतेमुळें व चौफेर नजर ठेवण्यांत आल्यामुळें बहुतेक प्रकार उघडकीस आले व अपराध्यांस अटक करण्यांत येऊन त्यांच्या बाबतींत योग्य ती उपाययोजना करण्यांत आली.

## पूर्व नियोजित आखिव व्यवस्था

भोजन शाळा, स्नानगृहें, शौचकूप, पाणी पुरवठा, प्रकाश, त्याचप्रमाणें श्रीसाईबाबांच्या मंदिरांत अभिषेक, पूजा अर्चा, नवस फेड, वगैरे कार्यासाठीं येणाऱ्या स्त्री पुरुषांच्या संख्येंत नेहमींपेक्षां कितीतरी पटीनें वाढ होणें स्वाभाविक होतें. त्या त्या ठिकाणीं शक्य तेवढी भक्तांची गैरसोय टाळावी व कमींत कमी वेळांत कार्यभाग पार पडावा या हेतूनें संस्थानच्या कारभाऱ्यांनीं व अधिकाऱ्यांनीं आगाऊ योजना आंखून ठेविल्या होत्या. त्यामुळें कोणत्याहि क्षेत्रांत गडबड न होतां प्रत्येक ठिकाणीं व्यवस्थितपणें कार्यक्रम पार पडत असत. शनिवार, ता. २५ हा श्रीरामनवमी उत्सवाचा मुख्य दिवस. त्या दिवशीं गर्दीनें उच्चांक गाठला होता. गर्दींत थोडी तरी गैरसोय सोसण्याची पाळी ही यावयाचीच; परंतु फारसा त्रास किंवा गैरसोय कोणाला सोसावी लागली नाहीं, हें विशेष होय.

## सर्वांना धन्यवाद

जेथें नाना ठिकाणचे व नाना प्रकारचे लोक हजारोंच्या संख्येनें एकत्र जमतात तेथें त्या सर्वांची नीट व्यवस्था ठेवणें, सर्वांचें समाधान साधणें व कोणालाही तक्रार करण्यास जागा न ठेवणें ही साधी गोष्ट नाहीं; यांतच उत्सव चालकांची व व्यवस्थापकांची खरी कसोटी लागत असते; लिहायला आनंद वाटतो कीं, या कसोटीला संस्थानाची कारभारी मंडळीं पूर्णपणें उतरली. लहान मोठ्या सर्व कार्यकर्त्यांनीं हें बाबांचें कार्य आहे, त्या पवित्र कार्याशीं आपला संबंध जडलेला आहे व तें कसोशीनें व कौशल्यपूर्वक पार पाडणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे या भावनेनें तें समाधानपूर्वक पार पाडिलें! याबद्दल त्या सर्वांना द्यावें तेवढें धन्यवाद थोडेच होतील.

## रोषणाई व सजावट

या महोत्सवानिमित्त मंदिराची व इतर इमारतींची रंगरंगोटीनें, ध्वजापताकांनीं व रोषणाईनें सुंदर सजावट करण्यांत आली होती. भक्तांची जास्तींत जास्त सोय व्हावी यासाठीं व सर्वांना सुखानें रहातां यावें. या हेतूनें मंडप घालण्यांत आले होते; ठिकठिकाणीं रंगीबेरंगी व कलापूर्ण कमानी उभारण्यांत आल्या होत्या. रात्रीच्यावेळीं विजेच्या रंगीबेरंगी बत्त्यांमुळें प्रेक्षकांच्या डोळ्यांचें पारणें फिटत असे.

रहाणें सवरणें, शौच मुखमार्जन, स्नान व भोजन या प्रत्येकाच्या अत्यंत आवश्यक गरजा होत. हजारो लोकांच्या दृष्टीनें या गरजा पुऱ्या करणें ही सहज साध्य गोष्ट नव्हती; परंतु त्या त्या खात्यावर नेमलेलीं माणसें आपापले काम शक्य तेवढ्या कसोशीनें पार पाडण्यासाठीं झटत होतीं. उत्सवाच्या तिन्हीं दिवस भोजन शाळेच्या चालकांनीं व वाढप्यांनीं लोकांना उत्तम प्रकारचें भोजन दिलें भोजनाचा एक वेळचा दर बारा आणे होता. त्या बारा आण्यांत रोज शिरापुरी, बुंदीचे लाडू व जिलबी यापैकी कांहींना कांहीं गोड पक्वान्न मिळत असे.

## तीन दिवसांतील कार्यक्रम

आतां आपण कार्यक्रमाकडे वळूं या. गुरूवारीं रात्रौ ह. भ. प. तुकाराम आजगांवकर यांचें सुश्राव्य कीर्तन झालें.

शुक्रवार, शनिवार व रविवार हे उत्सवाचे तीन मुख्य दिवस. पहाटेपासून श्रीसाई मंदिरांत होणारे काकड आरती वगैरे नित्याचे कार्यक्रम सुरू असतच व ते पाहण्यासाठीं भक्तांची गर्दी होत असे. त्याशिवाय शुक्रवारीं सकाळीं सहा वाजल्यापासून द्वारकामाईत श्रीसाई नामसंकीर्तनाचा व श्रीसाई सच्चरित्र वाचनाचा सुरू झालेला कार्यक्रम भक्तांच्या सहकार्यानें अहोरात्र चालू राहून त्याची समाप्ति शनिवारीं सकाळीं ६ वाजतां समारंभ पूर्वक मंदिरापर्यंत मिरवणूक काढण्यांत येऊन झाली. रोज सकाळीं संस्थान गवई श्री. विठ्ठलराव मराठे यांचें श्रीबाबांच्या समाधीसमोर सुश्राव्य गायन होत असे. संस्थानचा प्रातिनिधीक

१२६

अभिषेक होऊन नंतर सामुदायिक अभिषेक सुरू होऊन तो दुपारीं बारा वाजेपर्यंत चालत असे. या अभिषेकांत प्रत्येक वेळीं शेकडो स्त्रीपुरुष भक्तिभावानें व शांततापूर्वक भाग घेत असत.

श्रीसाईबाबांना वेळोवेळीं अर्पण करण्यांत आलेल्या बहुमोल वस्त्रांची प्रसाद म्हणून रोज सांजसकाळ ठराविक वेळीं जाहीर विक्री होत असे, व प्रसाद म्हणून असंख्य भक्त त्यावेळीं दाटीवाटीनें हजर राहून वस्त्रें विकत घेत असत.

## ह. भ. प. अनंतराव आठवले

या उत्सवांत ह. भ. प. श्री. दासगणू महाराज यांचे शिष्य व पुणें येथील ताराचंद रामनाथ हॉस्पिटलचे व्हाईस प्रिन्सिपल ह. भ. प. अनंतराव आठवले यांची रसाळ कीर्तनें भक्तवर्गाच्या दृष्टीनें एक मोठें आकर्षण असतें. कीर्तन प्रसंगीं भक्ति, हास्य, शोक आदि रसांचा आविष्कार करण्यांत अनंतराव वाकबगार आहेत. श्रोत्यांच्या मनावर त्यांच्या कीर्तनांचा चांगला परिणाम होत असतो. शुक्रवारी सायंकाळीं ५ वा. केलेल्या कीर्तनासाठीं अनंतरावानीं भक्त नरसी मेहता या आख्यानाची निवड केली होती. कीर्तन फार चांगलें रंगलें. नरसी मेहतांच्या जीवनांतील कांहीं उज्वल प्रसंग, विशेषतः त्यांच्या विवाहित कन्येच्या घरच्या मंडळीची भगवंतानीं केलेली शोभा व कानउघाडणी हे प्रसंग त्यांनी श्रोत्यांपुढें हुबेहुब उभे केले, अनेक वेळा कीर्तनकाराप्रमाणें श्रोत्यांचे नेत्र पाणावले, एवढी त्या कीर्तनांत एकतानता व गोडी निर्माण झाली होती.

दुसऱ्या दिवशीं दुपारी श्री. अनंतराव आठवले यांचें श्री राम जन्मानिमित्त श्रीराम चरित्रावर व तिसऱ्या दिवशीं काल्यानिमित्त श्रीकृष्ण लीलांवर अशीं दोन कीर्तनें झालीं. तींही चांगलीं रंगली. श्रीरामजन्माचा प्रसंग म्हणजे किती आनंदाचा व सौभाग्याचा. बालक रामाला पाळण्यांत घालून गोड सुरावर पाळणा म्हणतांना दुपारच्या त्या भुकेच्या वेळीं सारीं माणसें भूकतहान विसरून त्या प्रसंगाशीं तल्लीन झालीं होतीं. तिसऱ्या दिवशीं काल्याचें कीर्तन म्हणजे कृष्णाच्या बालसंवगड्यां-बरोबर झालेल्या नानाविध लीलांचें प्रात्यक्षिक. त्या प्रात्यक्षिकांचे व फुगड्यांचें वर्णन आम्हीं काय करायचें ? तें प्रत्यक्ष पहाण्यांतच मौज असते. अनंतराव या कार्यक्रमांतही तरबेज असून त्यांच्याशीं सहकार करणाऱ्या प्रत्येकावर ते मात केल्याशिवाय रहात नसत.

या तिन्ही दिवशीं सायंकाळीं पालखीची, रथाची व निशाणांची अशा तीन मिरवणुका सूरसनई, चौघडा व भजनी दिंडीसह थाटांत निघाल्या.

## कलावंतांचे विविध कार्यक्रम

रोज रात्रौ ठिकठिकाणाहून आलेले कलावंत श्रीबाबांच्या समोर आपआपल्या कलेची हजेरी भक्तिभावानें देत असत व सभामंडपांत हजर असलेल्या स्त्री-पुरुष भक्तांची करमणूक करीत असत. श्रीरामनवमीचे दिवशीं तर सर्वच रात्रभर [illegible]

कलावंतांचे आळीपाळीनें कार्यक्रम सुरू होते. त्यांत श्रीमती मेनका शिरोडकर, श्री. वसंतराव शिरोडकर, श्री. चव्हाण, यांच्यासारखे नामवंत कलावंत होते. याशिवाय श्री. दत्तोबा तांबे शिरोलीकर व श्री. तुकाराम खेडकर यांचे लोकनाट्याचे प्रेक्षणीय प्रयोग झाले. तिसऱ्या दिवशीं म्हणजे रविवारी सायंकाळी साकुरी येथील कन्याकुमारिकांच्या भजनाचा खास कार्यक्रम श्री. बाबांच्या समाधीपुढें झाला. त्यानंतर पं. जगन्नाथ महाराज सुरतकर यांच्या शास्त्रोक्त गायनाचा बहारदार कार्यक्रम झाला. पं. जगन्नाथ-महाराज हे गेलीं सुमारें दहा वर्षें साकोरी येथें सेवाभावानें राहिले असून शिरडी येथील या महोत्सवांत भक्तांना त्यांच्या गायनाचा लाभ झाला ही समाधानाची गोष्ट होय.

## इतर विविध कार्यक्रम

मुंबईहून पावना देवी बँड पथक लव्याजम्यासह व सर्व प्रकारच्या वाद्यांसह बाबांच्या सेवेला हजर राहिले होतें. त्या पथकाचेही कार्यक्रम मधून मधून होत असत. हे पथक २४ तरुणांचें होतें. श्री रामनवमीच्या दिवशीं सकाळीं श्री गंगा गोदावरीच्या कावड्यांचीं मिरवणूक व तें पवित्र जल समाधीला अर्पण करण्याचा समारंभ याकडेही असंख्य लोकांचें लक्ष लागून राहिलेलें असतें. तो कार्यक्रमही सुव्यवस्थित रीतीनें पार पडला. त्या दिवशीं रात्रौ संस्थानच्या पटांगणांत नयनरम्य असें रंगीबेरंगी दारूकाम सोडण्यांत आलें होतें.

गावांत सुप्रसिद्ध मल्लांच्या कुस्त्यांचाही कार्यक्रम आखण्यांत आलेला होता. त्यांत सुमारें शेंपाऊणशें मल्लांनीं भाग घेतला होता. परिक्षक मंडळानें कुस्त्यांच्या चढाओढींत प्रवीण ठरविलेल्या मल्लांना बक्षिसें वाटण्यांत आलीं, त्याशिवाय तमाशे, सिनेमा व करमणुकीचे इतर प्रकारही लोकरंजनासाठीं सज्ज होते.

## कोपरगांव, बेलापूर नगरपालिकांचें सहकार्य

यात्रेनिमित्त भक्तिभावानें जमलेल्या एवढ्या प्रचंड स्त्री पुरुष जमावाची सर्व बाजूंनीं नीट व्यवस्था ठेवण्याचें हें कार्य पार पडलें ही बाबांची कृपा होय. त्यांनींच सर्वांना प्रेरणा दिल्यामुळें सर्वांच्या सहकार्याचा लाभ घडला. आरोग्य रक्षणाची जबाबदारी किती महत्वाची असते याची सहसा कोणाला कल्पनाही करतां येणार नाहीं. उत्सव चालकास त्यासाठीं सतत डोळ्यांत तेल घालून जपावें लागत होतें. या कार्यांत कोपरगांव व बेलापूर नगरपालिकांच्या प्रमुखांनीं झाडूवाले व भंगी जरूर त्या प्रमाणांत पुरविले याबद्दल त्या प्रमुखांचे व कामगारांचे आभार कितीही मानले तरी ते थोडेच होतील. तसेंच निरनिराळ्या वेळीं जो आवश्यक मालाचा पुरवठा झाला त्यांत गोदावरी शुगर मिल्सच्या जनरल मॅनेजरनीं कृपाळू होऊन जरूर त्या प्रमाणांत साखरेचा पुरवठा केल्यामुळें तिन्हीं दिवसांतील भोजनप्रसंगीं सर्वांची तोंडें गोड करणें शक्य झालें. त्याबद्दल त्यांना धन्यवाद! शिरडी येथील उत्सव प्रसंगीं त्यांचें असेंच सहकार्य लाभो. साकोरी येथील उपासना आश्रमांतील कन्याकुमारीकांच्या गोड

# देवाघरचा शाश्वत कायदा

लेखक : आप्पाराव

**जसें द्यावें तसें घ्यावें. जसें पेरावें तसें कापावें. प्रेम द्यावें व प्रेम दुप्पटीनें घ्यावें. दुसऱ्यास दुःख द्यावें व स्वतःवर दुःखाचा वर्षाव करवून घ्यावा. देवाघरचा हा कायदा आहे. तो कधीं बदलत नाहीं. त्याची अंमलबजावणी कडक रीतीनें केली जाते. तेथें दया माया नाहीं! यासाठीं देवाचा कायदा समजून घेऊन त्याप्रमाणें वागा म्हणजे सुखी व्हाल. ही बाबांची बहुमोल शिकवण आहे.**

या जगांत जे परस्परांमध्यें व्यवहार होत असतात, त्यांच्यामागें नियमबद्धता व अलिखित असा ईश्वरी कायदा असतो. कोणतीही घटना किंवा गोष्ट उगाच घडत नाहीं. तिला कांहीं तरी कारण घडलेलें असतें. सर्वच कारणें आपणास समजतात असें मात्र नाहीं. यासाठीं आपण तो ईश्वरी कायदा समजून घेतला पाहिजे. ईश्वरी कायदा धाब्यावर बसवून आजवर कोणीही सुखी झाला नाहीं व होणार नाहीं. त्या कायद्याला तुम्हीं ठोकर दिली, त्याला लाथाडलें तर तुम्हांलाही ठोकरा खाव्या लागतील; दुःख भोगावें लागेल. ईश्वराचे भक्त हें ओळखतात. सर्व सुखाचें आगर, सौंदर्याची खाण, आनंदाचें नंदनवन म्हणजे कृपाधन श्रीरामचंद्र हें भक्ताला समजतें. परंतु भगवंताचें तें स्वरूप सर्वांसाठींच आहे; परंतु सर्वांना त्याचें आकलन होत नाहीं इतकेंच; सर्वांनीं सुखी व्हावें यासाठीं भगवंतानें ही सृष्टि निर्माण केली आहे. परंतु याची जाणीव कोणाला आहे का ? जाणीव नाहीं म्हणून ठोकरा खाव्या लागतात! ईश्वर तुम्हांला प्रत्यक्ष ठोकरा देत नाहीं. सृष्टीचा

---

भजनांचा लाभ घडून आणण्यांत तेथील व्यवस्थापक श्री. वाघ यांचे व त्यांच्याबरोबर श्री. जगन्नाथ महाराज यांचेहि आभार मानणें जरूर आहे.

अशा रीतीनें लहान मोठे सर्व कार्यकर्ते, कलावंत, पोलीस, होमगार्डस, स्वयंसेवक, शिरडी संस्थानचे कार्यकर्ते तसेंच गांवांतील व गांवांबाहेरील सर्व भक्तांनीं, बाबांनीं सुरू केलेला हा श्रीरामनवमी उत्सव यशस्वी करण्यांत भाग घेतला आहे. जें कांहीं यश मिळालें तें सर्वांच्या निर्मळ सहकाराचेंच फळ होतें. या सर्वांचें श्रीसाईबाबा कल्याण करोत व वर्षानुवर्ष असाच सहकार देण्याची सर्वांना सद्बुद्धि देवोत हीच त्यांच्या चरणीं प्रार्थना आहे.

—*—

अलिखित कायदाच असा आहे कीं, तो तुम्हांला चाबकाचे फटके लगावतो. मनुष्य निर्मित, सरकार निर्मित कायदेकानू जरुरीप्रमाणें व अनुभवांनीं बदलून घ्यावे लागतात; परंतु ईश्वरी कायदा जो एकदां ठरला आहे. पास झाला आहे, तो अबाधित, अखंडीत व अव्याहत चालू आहे! ईश्वर भक्ताच्या इच्छेनुरूप स्वतः बदलेल, रूप पालटेल; परंतु त्याचा कायदा कधींही बदलला जाणार नाहीं.

**द्या आणि मग घ्या**

तुम्हांकडून जसें कार्य घडेल तसेंच त्याचें फळ तुम्हांला मिळेल. या नियमांत केव्हांही फेरबदल घडणार नाहीं. या भूमीवर जीं माणसें दिसतात त्यांच्याशीं तुम्हीं प्रेमानें वागलां तर त्यांचें प्रेम तुम्हांला मिळेल. तिरस्कारानें, मत्सरानें व रागानें वागलां तर तुमच्यावर तिरस्कार मत्सर यांचा भरपूर वर्षाव होईल. या भूमीवर जसें द्यावें तसें घ्यावें जसें पेरावें तसें पीक घ्यावें, थोडें तरी देण्याची वृत्ती बाळगा. जेवढें द्याल त्याच्या दिढी दुप्पटीनें तुम्हीं मिळवाल. प्रेम, धन, धान्य किंवा कोणतीही गोष्ट असो; द्याल त्यापेक्षां अधिक तुम्हीं मिळवूं शकाल. मिळविण्याचा सोपा मार्ग देणें हाच हाच. मग तें कांहींही असो. तुम्हांला काय मानसन्मान पाहिजे. तो दुसऱ्यांना देण्याची तयारी ठेवा. मग पहा, तुमच्या वाट्याला दुप्पट मानसन्मान येईल! दुसऱ्याला द्यावें आणि आपण मिळवावें हा ईश्वरी कायदा अनादी कालापासून चालू आहे. ईश्वरानें हजारो वर्षांपूर्वी जी कायदेमंडळाची पहिली वहिली बैठक भरविली त्या बैठकींत सर्वानुमते पास झालेला हा कायदा आहे. दुसऱ्याकडून सुख मिळावें असें वाटतें परंतु आपण मात्र दुसऱ्यास शक्य त्या परीनें दुःख देत रहावयाचें; दुसऱ्याकडून कांहीं फायदा व्हावा अशी अपेक्षा करावयाची आणि दुसऱ्याचें नुकसान होईल असें आपण वागावयाचे. दुसऱ्यांनीं आपल्याशीं सदाचारानें चांगल्यारीतीनें वागावें अशी आकांक्षा बाळगावयाची व आपण मात्र इतरांशीं दुराचारानें, दुष्टपणानें वागावयाचें; दुसऱ्याकडून शुभ सुंदर व अभिनंदनीय वागणूक मिळावी म्हणून वासना उराशीं बाळगावयाची आणि आपण मात्र दुसऱ्याशीं हेव्यादाव्यानें व कपटानें वागावयाचें, हें कसें बरें चालेल? त्याचे दुष्परिणाम आपण भोगलेच पाहिजेत. अशा वागण्यापायीं भगवंतानें जें कांहीं थोडें बहुत आपणास दिलें असेल तेंही न कळतां नाहींसें व्हावयाचें!

तुम्हांला जें सौंदर्य, जें आरोग्य, जें सामर्थ्य व जें चैतन्य लाभलें आहे तें कोणामुळें! भगवंतामुळेंच ना! परंतु त्या गोष्टीचा तुम्हांला विसर पडला आहे. कर्ता करविता, देता देवविता व नियंता मीच; हें सारें मी निर्माण केलेलें. अशा अभिमानानें आम्हीं वागूं लागतों. हें घर माझें, ही शेतवाडी ही संपदा, हें माझें आहे. आणि एक दिवस भगवान या साऱ्यांची आणि तुमची कायमची ताटातूट घडवून आणितो आणि काय जाणवितो माहीत आहे! हें सारें तुमच्या सुखासाठीं आहे; परंतु तें तुमचें मात्र नाहीं. हा नियम समजून त्याप्रमाणें वागा. 128

### माझेपणाचा अहंकार सोडा

ईश्वरी कायदा किती सुखद व आनंददायक आहे! तुम्हीं घ्या ना तो समजून! या जगांतील प्राणीमात्र त्यांचा कायदा धाब्यावर न बसवितां तो समजून घेऊन त्याप्रमाणें वागतील तर त्यांना या संसारांत भरपूर सुखाचा लाभ नाहीं कां होणार? परंतु तशी सद्बुद्धि त्या सर्वांना होत आहे कां? भगवंताच्या नियमाप्रमाणें वागून आम्हीं त्यांच्या दयेला पात्र बनलें पाहिजे. तो दयासागर आहे. देऊं लागला म्हणजे किती देईल त्याची कल्पनाहि करवणार नाहीं. 'देतां किती घेशील दो करांनीं—'

भगवंताच्या कृपेनें या जगांत आपणांस सुखाचा आस्वाद घेण्याची संधी मिळते. कधीं कधीं दुःखाचाही अनुभव घ्यायला मिळतो; परंतु तें दुःखही आमच्या शाश्वत सुखासाठींच असतें बरें का! सुखामुळें आपण अधिकाधिक सुखाची अपेक्षा करू लागतो; मायाममतेच्या पसाऱ्यांत सांपडतो. ममतेचें प्रमाण वाढतें. तें दुःखाला कारण होणारें असतें. असें होणें हानीकारक मग तुम्हांला वियोग दुःख किंवा दुसरें कोणते तरी दुःख भोगावें सोसावें लागते. त्याशिवाय तुमचे डोळे उघडणें शक्य नसतें. त्यांतच मोक्षाची व संसार व्यापांतून मुक्तता करून घेण्याची प्रेरणा सामावलेली असते.

### आस्तिक व नास्तिक

आस्तीक आणि नास्तीक. ईश्वरावर ज्याची श्रद्धा असते तो त्या श्रद्धेच्या बळावर कधींना कधीं तरून जातो. तो दुःख सागरांत गटंगळ्या खात दीर्घकाळ रहात नाहीं. नास्तीकाचें मात्र तसें नाहीं. तो शिव्यागाळीं देऊं लागतो. चडफडतो, बडबडतो. बडबडो किंवा आणखी कांहीं करो; त्याला ईश्वरी कायद्याचा भंग करतां येणार नाहीं. त्या कायद्याखालीं त्यांनेंही वाकलेच पाहिजे. त्याशिवाय त्याचा निभाव लागणार नाहीं.

व्यक्ति असो; समाज असो; किंवा देश असो. ईश्वरी कायद्याचा अमंल त्या सर्वांवर होत असतो. व चालत असतो. त्यांच्या अंतिम परिणामापासून कोणीही सुट्ट शकत नाहीं. आपल्या हातून, मग ती व्यक्ति असो, बहुजनसमाज असो वा अखिल देश असो जर का सत्कार्य घडलें असेल तर त्याचे इष्ट व शुभ परिणाम आपल्या वाट्याला येतील. तुमच्याकडून अशुभ, वाईट कार्य घडलें असलें, तुम्हीं दुसऱ्यांस दुःख दिलें असलें, फसविलें तर देव त्याबद्दल तुम्हांला योग्य ती शिक्षा आपण घडविलेल्या कायद्यानुसार दिल्याशिवाय रहाणार नाहीं.

श्रीसाईबाबा या गोष्टींची नेहमी आपल्या भक्तांना आठवण करून देत असत. समजणारे समजत असत व त्यापासून योग्य तो लाभ करून घेत असत.

देवाच्या दरबारचा न्यायाचा काटा अगदीं समतोल, सारखा आहे. तो न्याय देण्यांत कधीं चुकणार नाहीं. तेथें द्वेषभाव, रागरोष, पक्षविक्ष, अन्याय केव्हांही संभवत नाहीं. प्राणिमात्रांचें कल्याण व्हावें यासाठींच भगवंताची सर्वकाळ धडपड चाललेली असते.

कोणी एक गृहस्थ धनाचा भयंकर लोभी आहे. त्याला धनसंचय करणें वाटेल त्या मार्गांनीं धन मिळविणें एवढें समजतें. त्याचें योग्य कारणी वितरण करणें त्याला समजत नाहीं व तें त्याला मानवत नाहीं. एखादे दिवशीं त्याच्या घरीं पडतो दरोडा, आणि दरोडेखोर सारें द्रव्य लुबाडून पसार होतात! किंवा अन्य मार्गानें तें द्रव्य त्याच्यापासून दूर होते. कोठें जातें, कसें जातें व काय हातचलाखी होते ती त्याला समजतही नाहीं. तें जातें एवढें मात्र खरें. मग त्याचे डोळे उघडतात मग तो ऊर दडवून घेऊं लागतो. काय आहे त्याचा उपयोग? त्याऐवजीं मिळविलेल्या संपत्तीचा विनियोग आपल्या हातांनी तें सत्कारणीं देऊन टाकण्यांत केला असता तर ईश्वरी कायद्याचें पालन केल्याचें समाधान नसतें का मिळालें? त्यामुळें सुख समाधान व संतोष नसता का वाट्याला आला?

## जसें पेरावें तसें कापावें

कधीं कधीं आपल्या वाट्याला दुःखभोग येत असतात. जीव दुःखाने बेजार होऊन जातो. त्याचा दोष आपण नेहमीं दुसऱ्या कोणाच्या तरी माथ्यावर मारीत असतो. परंतु नाहीं हो नाहीं. निश्चित समजून रहा कीं, तुम्हांला झालेल्या दुःखाचें कारण, तुमच्या वाट्याला आलेल्या हालअपेष्टांचें कारण दुसरे कोणीही नसून तुमचे तुम्हींच आहांत. नका दुसऱ्यांना दोष देऊं उगाच. तुमच्याच वागणुकीचें व कर्मांचें फळ तुम्हीं भोगीत असतां. तें भोगल्याशिवाय तुमची सुटका नसतें. सुख वाट्याला येतें तें तरी कशामुळें? तुमच्या चांगल्या वागणुकीचें तें शुभ फळ असतें हें निश्चित समजा.

तुम्हीं दुसऱ्यांना, नातलगांना, मित्रांना व शेजाऱ्यापाजाऱ्यास सुख देऊन पहा, त्यांच्याकडूनही तुमच्यावर सुखसमृद्धीचा वर्षाव होत राहील. जसें पेरावें तसें पीक घ्यावें.

याासाठीं मित्रांनो! ईश्वरी कायदा समजून घ्या. उगाच वायफळ बडबड करीत बसूं नका. ईश्वरी कायदा समजून घेऊन त्याप्रमाणें वागणें यांतच जीवनसाफल्य आहे. जीवन समृद्धि आहे. सुखी व आनंदी जीवनाचा ही महामंत्र आहे.

श्रीसाईबाबांनीं तुम्हीं सुखानंदांत रहावें, तुम्हांला दुःखाचा लवलेशही लागूं नये, ह्यासाठीं हयातभर जी बहुमोल शिकवणूक दिली तिचा सदुपयोग करून घेऊन आपलें जीवन सफल करा.

**जो जो मज भजे, जैशा जैशा भावे ॥**
**तैसा तैसा पावें मीही त्यासी ॥**

# मी जीवनांत काय शिकलों ?

**यशस्वी जीवनाचा भगवंताशीं अत्यंत निकट संबंध आहे. ज्यांनीं जीवनांत अपरंपार यश मिळविलें ते काय सांगतात; ते जीवनांत यशस्वी कसे झाले हें समजवून घेण्यासारखें असतें. वरिष्ठ कोर्टाचे न्यायाधीश व सध्यां बनारस विश्व-विद्यालयाचे उपकुल गुरु श्री. भगवती यांचे बहुमोल अनुभव प्रत्येकास मार्गदर्शक होण्यासारखे आहेत.**

'**या** जीवनांत मी काय शिकलों ! ' या मथळ्याखालीं, श्री. के. एम्. मुनशी यांनीं चालविलेल्या '**भवान्स जर्नल**' या इंग्रजी पाक्षिकांत माजी नामांकित न्यायाधिश व सध्यांचे बनारस विश्वविद्यालयाचे उपकुलगुरु श्री. एन्. एच. भगवती यांचा एक सुंदर मननीय लेख गेल्या महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. आम्हांला तो इतका बोधपर वाटला कीं आमच्या वाचकांना त्याचा थोडातरी रसास्वाद चाखविल्या-शिवाय आमच्यानें रहावेना.

## नेत्रदीपक यशाचें आदिकरण

खरोखर ज्यांनीं या जीवनांत वाखाणण्याजोगें यश मिळविलें आहे व त्यामुळें जे सर्वांच्या आदरास पात्र होऊन राहिले आहेत त्यांचे अनुभव ऐकण्यासारखे व अनुकरण करण्यासारखे असतात.

श्री. भगवती हे यशस्वी कायदे पंडीत व यशस्वी न्यायाधीश म्हणून ख्याती पावले आहेत. त्यांनीं एवढें हें नेत्रदीपक यश कशाच्या बळावर मिळविलें ? ज्या गाढ बुद्धि-मत्तेच्या बळावर त्यांनीं यश व नांवलौकिक संपादन केला ती बुद्धिमत्ता ते जन्माबरोबर घेऊन आले होते का ? होय; एखाद्यास ईश्वर दत्त बुद्धिमत्तेची देणगी लाभलेली असते व तिच्या बळावर तो झपाझप यशाच्या पायऱ्या चढत जाऊन शेवटीं यशाचें अत्युच्च शिखर काबीज करण्यांत तो यशस्वी होतो. परंतु अशी गोष्ट विरळाच घडून येत असते. श्री. भगवती यांच्या या म्हणण्यावर तेवढा विश्वास नाहीं ते म्हणतात, बुद्धिमत्ता असली तरी तुमच्या पदरांत यशाचा पुरा वाटा टाकण्यास तिचा फारसा उपयोग होत नाहीं. तिच्या जोडीला उद्योग व अविश्रांत परिश्रम यांचें सहकार्य असलेंच पाहिजे. तुम्हांला कोणत्याही व्यवसायांत अथवा उद्यो-गांत यश मिळवावयाचें आहे ना ? मग अविश्रांत मेहनत घ्या; सतत उद्योग करा म्हणजे यश तुमचा दरवाजा ठोठावल्याशिवाय रहाणार नाहीं.

## पहिल्या प्रतीचे परिश्रम

ते म्हणतात सर्वच माणसें कांहीं पहिल्या प्रतीच्या बुद्धिमत्तेची नसतात तीं तशीं नसलीं तरी त्यांना पहिल्या प्रतीचे परिश्रम खास करतां येतील व मग अंगीकृत कार्यात सुयश मिळविण्याचा त्यांचा मार्ग आपोआप मोकळा होईल. बुद्धिमत्ता ही ईश्वरदत्त देणगी असली तरी परिश्रम हे तुमच्या हातचे आहेत. जें तुमच्या हातचें आहे तें तुम्ही मन लावून पूर्णांशानें कां करूं नये ? पहिल्या प्रतीची बुद्धिमत्ता असलेल्या माणसाला जें साध्य होणार नाहीं तें पहिल्या प्रतीचे परिश्रम करणाऱ्यास निश्चितपणें साध्य होऊं शकतें. जन्मजात बुद्धिमत्तेवर तुम्ही अवलंबून राहिलां तर तुम्हांला जें साध्य होणार नाहीं तें नेटाचा व सतत उद्योग केल्यानें तुम्हांला साध्य करतां येईल. तुम्ही विद्यार्थी असा, कोणताहि धंदा वा व्यवसाय करणारे असा; तुम्हीं जास्तींत जास्त परिश्रम करून त्यांत तज्ञ होण्यासाठीं झटा. जीवनांत यशस्वी होण्याचा हाच राजमार्ग आहे.

## आमच्या विद्यार्थीवर्गाचें धोरण

विद्यार्थी असतो तो जेमतेम परिक्षेंत उत्तीर्ण होण्याइतपत अभ्यास करतो. त्याला आपण जास्तींत जास्त ज्ञान मिळविलें पाहिजे. आपण जास्त ज्ञान मिळवून अधिक खंबीर बनलें पाहिजे. पासापुरते नाहीं तर पहिला क्रमांक मिळवितां येईल एवढे गुण आपणास मिळवायचे आहेत. त्यामुळें नुकसान कांहींच होणार नाहीं परंतु पुढील जीवनांतही त्याचा उपयोग होणार आहे ही दृष्टीच आमच्यापुढें नसते. येन केन प्रकारेण जेमतेम उत्तीर्ण झालें म्हणजे संपलें आपले काम. मग पुढील आयुष्यांत उच्चांक कसा बरें गांठतां येईल ? तुम्हीं एकदां का तुमच्या व्यवसायांत पडलां व त्या चरकांत सांपडला म्हणजे मग तुम्हांला इकडे तिकडे पहाणें, अधिक ज्ञान संपादन करणें, या गोष्टी शक्य होत नाहींत. विद्यार्थी दशेतच हें शक्य असतें व म्हणून त्या काळांत जास्तीच जास्त मेहनत घेऊन आपल्या विषयाचें जितकें म्हणून ज्ञान संपादन करतां येईल तेवढें संपादन केले पाहिजे.

## तुमच्या यशाची गुरुकिल्ली सांगा

पुष्कळ लोक मला कुतूहलानें विचारतात कीं तुम्हीं निष्णात वकील व समतोल न्यायाधीश म्हणून कीर्ति मिळविली ती कशाच्या बळावर ? त्या यशाची गुरुकिल्ली कोणती ? या प्रश्नाचें उत्तर काय द्यावें हें माझें मला समजत नाहीं; परंतु बारीक दृष्टीनें व विचारपूर्वक संशोधन करतां मला सांगावेसें वाटतें कीं, ईश्वरानें मला बुद्धीमत्ता जरी पहिल्या प्रतीची दिली नसली तरी मी जें जें कांहीं हातीं घेतलें किंवा जी जी जबाबदारी मी स्वीकारली ती करीत असतां मी अतोनात परिश्रम केले, कांहीं करायचें बाकी ठेवावयाचें नाहीं ही माझी नेहमींची वृत्ती. माझ्याकडे एखादी ' केस ' आली असतां तिच्यासंबंधीचे कागदपत्र बारकाईनें विचारपूर्वक तपासून पहाण्यांत मी केव्हांही कसूर केली नाहीं. त्याचा विचार सर्व बाजूंनीं करावयाचा व मग निर्णय द्यावयाचा. कोणाच्याही बाबतींत अन्याय होऊं द्यावयाचा नाहीं. तेव्हां यश मिळत गेलें तें

कोठून तरी प्रेरणा मिळाली म्हणून नाहीं तर त्यासाठीं घाम गाळायला मी कधीं कमी केलें नाहीं म्हणून. शिवाय हातीं घेतलेलें कार्य ही देवपूजा आहे. देवाला स्मरून तें मनोभावें पार पाडण्यासाठीं झटावयाचें ही वृत्ती माझ्या ठिकाणीं बाणली गेली आहे. 'कर्मण्येवाधिकारस्ते माफलेषु कदाचन' हें भगवंताचें वाक्य नेहमीं आमच्या दृष्टीसमोर असावें. ईश्वराला स्मरून देवाचें हें काम आहे, या भावनेनें तें लक्षपूर्वक पार पाडण्यासाठीं झटावयाचें. हे माझें कर्तव्य आहे, हा माझा धर्म आहे, हें देवाचें कार्य आहे या भावनेनें त्यासाठीं झटावयाचें मग त्यांत यश मिळो वा मिळो. तें ईश्वरार्पण करून आपण मोकळे व्हावयाचें. त्याच्या परिणामाची चिंता आपण वहावयाची नाहीं. ती चिंता भगवंताची. 'योगः कर्मसु कौशलम्' या भावनेनें चुकारपणा यत्किंचीतही न करतां सर्व बळ एकत्र करून हातांतील काम पार पाडावयाचे. त्यामुळें तुमच्या मनाला शाश्वत शांति मिळेल. कसलीच भगभग वाटणार नाहीं. सारें बळ एकत्र करून व मी करीत आहे हें भगवंताचेंच कार्य आहे या श्रद्धेनें तुम्ही कोणतेंही कार्य करूं लागलां तर त्यांत यश मिळवून देणारा तुमचा पाठीराखा भगवंत आहे म्हणून खास समजावें.

## कशाचीहि अपेक्षा नको

मला नांव किंवा कीर्ति मिळणार या भावनेनें कोणतीहि गोष्ट करावयाची नाहीं. तुम्ही नांवाची अपेक्षा बाळगूंच नका. मग तुम्हांला अपयश मिळालेंच तरी निराश होण्याची पाळी तुमच्यावर येणार नाहीं. 'न मे कर्मफले स्पृहा.'

अशा प्रकारची मनोवृत्ति अंगीं बाणावी यासाठीं आपण झटून प्रयत्न केला पाहिजे. हें जें सांगितलें त्याचा जीवनांतील प्रत्येक गोष्टीशीं संबंध आहे. पुष्कळ वेळां आपण काम कर कर करतों; जिवापाड मेहनत घेतों. फार मोठ्या अपेक्षा बाळगलेल्या असतात. त्या पूर्णत्वास येत नाहींत. मग जी कांहीं निराशा पदरीं पडतें तिचें वर्णन करतां येणार नाहीं. परंतु अपेक्षा बाळगणें हेंच चुकीचें आहे. जें केलें तें मनापासून सारें शक्ति, बळ एकवटून केलें. तें देवाच्या नांवानें केलें. तें ईश्वरार्पण बुद्धीनें केलें म्हणजे झालें. यश देणें न देणें त्याच्या हातीं. आपण अपेक्षा करावयाची नाहीं. मग निराशेला किंवा मनाची शांति बिघडावयाला जागा कुठें राहिली !

## आपल्या कामाशीं तद्रूपता

श्री. भगवती म्हणतात, मी याच धोरणानें वागत आलों. हातांतील काम तद्रुपतेनें पार पाडण्यांत कसूर करावयाची नाहीं, एवढेंच मी पहात आलों. मला हायकोर्टांतील किंवा सुप्रिम कोर्टांतील न्यायाधिशाची जागा मिळेल अथवा बनारस विद्यालयासारख्या थोर संस्थेच्या उपकुलगुरुपदीं माझी योजना होईल या गोष्टी माझ्या ध्यानीं मनीं कधींहि आल्या नाहींत; परंतु त्या मानाच्या व थोर जबाबदारीच्या गोष्टी मी न मागतां किंवा मी अपेक्षा न करतां माझ्यामागें चालत आल्या. त्या गोष्टी माझ्या वाट्यास आल्या ही देवकृपा होय. त्याला वाटलें कीं अशा रीतीनें

माझा गौरव करावा. मी देवाच्या हातांतील एक खेळणें आहे. सूत्रचालक, सारीं सूत्रें हालविणारा व मला नाचविणारा तोच आहे असें आजवर मी समजत आलों आहे. जें यश मिळालें त्याचा मला अहंकार नाहीं. जें मिळालें, जें कांहीं वाट्यास आलें तें प्रेमपूर्वक त्याला समर्पण.

शेवटीं माझ्या अनुभवाची एक गोष्ट सांगायची राहिली. ती सांगायची फारशी जरुरी नाहीं. तरीही सांगणें जरूर वाटतें. इतरांस त्यापासून बोध घेतां येईल.

## कृतज्ञताशून्य लोक

आपल्या सभोवार जीं माणसें वावरत आहेत व ज्याच्यासाठीं झटून आपण कांहीं ना कांहीं करतों, त्यांना त्याबद्दल जरासुद्धां कृतज्ञताभाव वाटत नाहीं हा माझा व अनेकांचा अनुभव आहे तुम्हीं एखाद्यासाठीं झटून पुष्कळ करावें व एखादे प्रसंगीं तुम्हीं त्याच्या उपयोगी पडूं शकला नाहीं तर मागें जें कांहीं केलें त्यावर गार पाणी पडून तें सारें वाया जाते व तोच माणूस तुमचा कट्टर शत्रू बनतो व तुमच्याविरूद्ध कारवाया करूं लागतो. असा हा मानवी स्वभाव आहे. पदोपदी हा अनुभव येत असतो. ज्यानें जन्म दिला त्या भगवंताचेबद्दल ज्यांना काडी इतकी कृतज्ञता वाटत नाहीं मग तुम्हीं त्यांच्याकडून कृतज्ञतेची अपेक्षा कां बरे करावी ?

## आपण चुकारपणा करावयाचा नाहीं

अशी वस्तुस्थिति आहे म्हणून का आपण इतरासंबंधीच्या आपल्या कर्तव्यांत चुकारपणा किंवा हेळसांड करावयाची ? मुळींच नाहीं. नेहमीं सत्कृत्यें करीत रहाणें दुसऱ्यांच्या उपयोगी पडत रहाणें हा तुमचा धर्म आहे. हें तुमचें पवित्र कर्तव्य आहे. कोणी कृतज्ञ राहो वा न राहो; आपण आपलें कर्तव्य पार पाडण्यासाठीं अहर्निश झटावयाचें. दुसरें जाणीवेनें वागतील व पाठ थोपटतील म्हणून कोणतीही गोष्ट आपण करावयाची नसून तो आपला धर्म आहे, तें ईश्वर दत्त असें आपलें कर्तव्य आहे या भावनेनें आपण वागावयाचें आहे.

या धोरणानें तुम्हीं वागूं लागला म्हणजे तुमचें जीवन समृद्ध व यशस्वी होईल.



# मला आणखी पाहिजे

सर्व पापांचें मूळ लोभांत— ' मला आणखी पाहिजे, ' या हव्यासांत आहे. आणि ही वृत्ती जोंपर्यंत आपण पोशीत राहूं तोंपर्यंत आमच्या वाट्याला सुखाचा लवलेशही येणार नाहीं. त्या वृत्तीचा त्याग करण्यांत सुख, समाधान व संतोष आहे.

मला आणखी पाहिजे ! ही तृष्णा अत्यंत घातक आहे. तिच्यापासून सुटका करून घेतल्याशिवाय मनुष्य सुखी होणार नाहीं. सुख कशांत आहे ? समाधानांत आहे. आहे त्या परिस्थितींत समाधान मानून रहाणें यासारखें सुख नाहीं. आणखी मिळविण्याचा हव्यास हा अत्यंत हानिकारक आहे. आमच्या उन्नतिच्या व प्रगतिच्या आड येणारी जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे आम्हांला सतावणारी आणखीची तृष्णाच होय.

## संपत्ति कोणाची ?

जवळ थोडी फार संपत्ति आहे. तिच्यावर आमचा केवढा लोभ ! तिची वृद्धी व्हावी; तिच्यांतील छदामही खर्च होऊं नये यासाठीं केवढी काळजी ! जोंपर्यंत अशा भावनेला चिकटून राहाणारीं माणसें समाजांत आहेत तोंपर्यंत त्या त्या व्यक्तिचें व समाजाचें कल्याण होण्याची आशाच बाळगायला नको.

आपल्याजवळ पूर्वसंचितामुळें थोडी संपत्ति जमा झाली तर तिच्यावर आपलाच सर्वाधिकार आहे असें मानणें ही चूक आहे. ती भगवंतानें दिलेली व भगवंताची आहे. तिचा उपयोग आपण दीन दुबळ्यांसाठीं व गोरगरिबांसाठीं केला पाहिजे. तेंच तर आपलें पवित्र कर्तव्य आहे. परंतु आपल्याकडून तें पार पडत असतें का ? आम्ही आमच्या पोषणासाठीं जरूर लागणाऱ्या संपत्तीचा विनियोग जरूर करावा; परंतु बाकी संपत्तीचा उपयोग ज्यांना जरूरी आहे, त्यांच्यासाठीं नको का करायला ? परंतु हा सद्विचार किती जणांच्या डोक्यांत येत असतो बरें ?

## सभोंवारची स्थिति पहा !

सभोंवार अनेक माणसें पोटभर मिळत नाहीं म्हणून अहोरात्र धडपडत असतात. आणि आम्ही रोज पंचपक्वान्नांवर हात मारीत असतो. आपल्या सभोंवार किती तरी माणसें धड अंगभर वस्त्र मिळत नाहीं म्हणून लाजीरवाणें जीवन कंठीत असतात ! आणि आम्ही नानाप्रकारच्या सुटबुटांत नटण्यामध्यें व सुटांचे नाना प्रकार बनविण्यांत गढून गेलेले असतो ! पहा ना जरा सभोंवार डोळे उघडून ! किती विषम व विपरीत स्थितींत असंख्य लोक जीवन कंठीत असतात ! ही विषमता नाहींशी झाल्याशिवाय

समाज कसा बरें सुखी होईल ? 'मला आणखी पाहिजे !' हा मंत्र जोंपर्यंत आम्ही जपत राहूं तोंपर्यंत आम्हांला व समाजाला सुख मिळणार नाहीं.

## आहे त्यांत संतोष

लोभ आमच्यामागें सतत लागलेला आहे. त्याची ताटातूट कशी बरें होईल ? दुसऱ्याची वस्तू किंवा पैसा अपहार करण्याची दृष्टि आम्हीं सोडून दिली पाहिजे. अपरिग्रह पालन करण्यासाठीं झालें पाहिजे. व आहे त्यांत संतोष मानून रहाण्याची वृत्ति अंगिकारिली पाहिजे.

जी वस्तू आमची नाहीं, तिच्यावर आमची लोभी नजर पडतां कामा नये.

ज्या वस्तूची जरूरी नाहीं तिचा व्यर्थ हव्यास न बाळगतां तिची ज्याला जरूरी असेल त्याला ती देऊन टाकण्यांत समाधान मानिलें पाहिजे. तुझ्याजवळ दोन कोट आहेत. परंतु अशी किती तरी माणसें आहेत कीं ज्यांच्यापशीं एकही कोट नाहीं ! आणि ज्याच्याजवळ एकही कोट नाहीं, त्याला तुम्ही आपल्या जवळील दोन कोटापैकीं एक देण्यांत महत्त्व आहे नाहीं कां ?

ईश्वरावर भरिभार टाकून जें कांहीं मिळेल त्यांत समाधान मानून रहाणें, यांतच सुख आहे.

## दुसऱ्यांबद्दल आमची बेपर्वाई

आम्हांला जवळ करणें, जमा करणें, संचय करणें तेवढें समजतें. दुसऱ्यांस देणें, त्याग करणें या गोष्टी आमच्या गांवीं नाहींत. तो धडा आम्हीं कधीं शिकलों नाहीं व कधी गिरविलाहि नाहीं. दुसरे धडपडेनात व खुशाल मरेनात का; आम्हीं आमचे घर कुटुंब भरीत रहाणार ! द्यायचें नाहीं. नेहमीं जवळ करीत रहावयाचें; ही आहे आमची सदाची वृत्ति !

राजा उदार झाला व हातीं भोपळा दिला ! केवढें प्रचंड औदार्य ! असला दानधर्म काय कामाचा ? शेटजींनीं काळा बाजार करून ५–१० लाख रुपयांची कमाई केली व त्यांतून हजारभर रुपयांचा दानधर्म केला तर त्याला 'दानधर्म' म्हणतां येईल का ? ही दानधर्माची चेष्टा झाली. आपल्या समाजांत अशा प्रकारचा दानधर्म कधीं कधीं व कुठें कुठें आढळून येत असतो ! दुसऱ्यांचें रक्त शोषण करून व माना मुरगळून लक्षापधी रुपये जवळ करावयाचे व त्यांतून हजारभर रुपये मोठ्या कष्टानें वाटावयाचे ! शुद्ध व पवित्र आचरणानें व सरळ मार्गानें आम्ही धन मिळवावें. कोणाचेंही शोषण होणार नाही कोणालाही भारी वाटणार नाहीं व जें रीतसर तेवढें आम्हीं जवळ करावें व त्यांतुनच जें यथाशक्ति देतां येण्यासारखें असेल तें द्यावें.

## समाधान मिळविण्याचा मार्ग

होय; हा मार्ग स्विकारावयाचा म्हणजे आरंभी जड वाटेल व तो मार्ग स्वीकारण्याकडे कल होणारही नाहीं; परंतु आपलें लक्ष संपत्तीकडे नाहीं तर ती ज्याच्या कृपेनें आपल्या वाट्यास येते त्याच्याकडे व त्यानें केलेल्या प्राणीमात्राकडे लागून रहाणें जरूर आहे. त्यागानें मनुष्यजीवनाला शोभा येते. गोरगरीबांस लुबाडून धनवान होण्यांत कसला आला आहे आनंद ! त्यांचे अश्रू पुसण्यांत, त्यांचें सांत्वन व समाधान करण्यांत आनंद आहे. जीवनांत समाधान मिळावण्याचा तो मार्ग आहे.

## सुख संपत्तीवर अवलंबून नाहीं

अशा मार्गानें गेल्यामुळें आम्हीं गडगंज संपत्तीचे धनी नाहीं होऊं शकणार. म्हणून त्यांत काय बिघडलें ? गडगंज संपत्ति म्हणजे सुखाची खाण आहे का ? कोणता श्रीमंत सुखी असलेला आपल्या पहाण्यांत आला आहे ? त्यांच्या व्यापांची, दुःखाची कल्पना तरी आहे का आपणाला ? आमच्या जवळ पुष्कळ संपदा नाहीं म्हणून जगाच्या दृष्टीनें आम्हीं कदाचित् अकिंचन गरीब ठरूं. मग त्यांत काय बिघडेल ? आमचें समाधान, आमचा संतोष हेच आमचें परमश्रेष्ठ धन होय. त्याची कमाई करण्यासाठीं आपण झटावयाचें आहे.

## संतोष ही संपत्ति—

संतोषासारखें दुसरें धन नाहीं. आम्हीं साऱ्या आसक्तीपासून, साऱ्या लोभ-मोहापासून नेहमीं दूर रहाण्यासाठीं झटलें पाहिजे. लोभ-लालूच आमच्या वाऱ्याला उभी रहातां कामा नयेत. कोणी कोणाचें शोषण करायचें नाहीं तर प्रत्येकानें दुसऱ्यासाठीं झटायचें; त्यांच्या अडीअडचणी लक्षांत घ्यावयाच्या व त्या शक्य त्या मार्गानें दूर करण्यात आनंद मानावयाचा. किती सुंदर आहे हा विचार !

आम्हीं आमच्या गरजा वाढवीत बसता कामा नये. शक्य तेवढ्या गरजा कमी करावयाच्या. लोभ कशाचाही बाळगावयाचा नाहीं. पक्षी कशाचा लोभ बाळगतात ! घर दार; साठा कुठे असतो ? परंतु त्यांना रहायला आसरा व पोटासाठी देव देतच असतो. आमच्यापुढें उच्च आदर्श नेहमी असावा, अन्न वस्त्र व सुखोपभोग जरूर तेवढेच भोगावयाचे. भरमसाट पणा अलिकडे फार वाढलेला आहे. त्यामुळें खर्चही भरमसाट वाढला आहे, त्यासाठी अहो रात्र धडपड करायची, न्यायनीति पहायची नाहीं; दुसऱ्याच्या अडीअडचणीकडे लक्ष द्यायचे नाहीं ही आहे अमानुषी वृती. श्रीसाईबाबानीं आम्हांला हेंच सांगितलें आहे कीं दुसऱ्यांकडे लक्ष पुरवा सर्व सुखे संपदेचा स्वतःसाठींच उपयोग न करतां ज्यांना जरूरी असेल त्यांना हात उचलून देण्याकडे लक्ष पुरवा. माणुसकीनें वागा व मनुष्य जन्माला आल्याचें सार्थक करा.

---

# विसाव्या शतकातील साधुसंतांचें कर्तव्य.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टवीती उपकारें ॥ १ ॥

ही महाभगवद्भक्त श्रीतुकाराम महाराज यांची उक्ति सर्वतोमुखीं झालेली आहे; परंतु सृष्टिनियमाप्रमाणें सर्व गतवस्तूंविषयीं जनामध्यें जी अनास्था दिसून येते तीच या बिनमोल उक्तिसंबंधानेंही आहे. एखादें विधान जुनें झालें म्हणजे त्याचा लोकांच्या मनावर परिणाम होईनासा होतो. वास्तविक पाहिलें तर त्यांतील अर्थ कायमच असतो व त्याची थोरवीही तशीच कायम असते; परंतु अतिपरिचयामुळें लोकांचें लक्ष त्यावरून उडतें व त्याविषयीं अनादर उत्पन्न होतो. 'अतिपरिचयादवज्ञा संततगमनादनादरो भवति' या न्यायाला अनुसरून वरील संतवाक्याचाही अनादर होत आहे. सूर्यदर्शन दररोज होत असल्यामुळें त्याकडे लोकांचें लक्ष जात नाहीं. तथापि त्याच्या उपयुक्ततेमध्यें किंचित्ही न्यूनता होत नाहीं. लोकांची अनास्था झाली म्हणून विधानाची योग्यता कमी होते, असें मुळींच नाहीं.

## संत जगाच्या कल्याणासाठीं

तुकाराम महाराजांनीं सांगितल्याप्रमाणें संतांच्या विभूति जगाच्या कल्याणाकरितां अवतरतात. 'भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम्' हें कालिदासाचें वचनही वरील उक्तीला समानार्थकच आहे. जगाचें कल्याण हेंच संतांचें कर्तव्य होय. 'जग' हा शब्द इतका व्यापक आहे कीं त्यांत सर्व भूतमात्रांचा समावेश होतो. यावरून संतकार्याचें व्यापकत्व स्पष्ट दिसतें. एका विवक्षित देशाचें, जातीचें अथवा व्यक्तीचें कल्याण करणें असें आकुंचित कार्य कांहीं संतांचें नव्हे. ज्यांची धांव मंडूकाप्रमाणें कूपापर्यंतच असते त्यांनीं हवी तर अशी एकादी आकुंचित दिशा ध्यावी; परंतु ज्यांच्या पवित्र आत्म्याला 'उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम्' अशा प्रकारचे उदात्त संस्कार झालेले आहेत त्या महात्म्यांना अशी आकुंचित दिशा कधींच आवडणार नाहीं. 'तरीच संत म्हणावें। नेणें आपुलें परावें ॥ भूतमात्रीं हरीवीण। न पाहेचि दुजेपणा ॥' असा त्यांचा कडक बाणा असतो. वर्ण, जाति, लिंग इत्यादि भेदांना महत्त्व न देतां '...यस्य कस्यापि देहिनः। संतोष जनयेत् प्राज्ञस्तदेवेश्वरपूजनम् ॥' या उच्च तत्त्वाचें ते अवलंबन करितात. प्रत्येक प्राणिमात्राचा अंतरात्मा हा परमात्म्याचा अंश असून त्यांत परमात्म्याचें आकलन करण्याची शक्ति गुप्तरूपानें आहे हें ओळखून प्रत्येकास भगवत्प्राप्तीच्या मार्गाला लावणें हें त्यांचें अति पवित्र कार्य आहे. एका जातीस भगवत्प्राप्तीचा अधिकार आहे व दुसरीस नाहीं असा निर्बंध त्यांचेंजवळ नाहीं. 'न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः' अशी त्यांची उदार कोटी असते. थोर सत्पुरुषांची उच्च व व्यापक दृष्टि आमच्यासारख्या संकुचित दृष्टीच्या माणसांना कळत नसल्यामुळें आम्ही त्यांची परीक्षा करतांना ढोबळ आणि हास्यास्पद अशा चुका करितों. दृष्टि नसून केवळ स्पर्शेंद्रि-

यानें हत्तीचें शेपूट चांचपून त्याप्रमाणें तो शेपटीच्या आकाराचा असतो म्हणून लोकांना सांगतो. एखाद्या निर्द्वंद्व महापुरुषाविषयीं 'महाराष्ट्राचे सद्गुरु' 'प्रपंच व परमार्थ यांची सांगड घालणारे राजकरणी संत' असलीं एकदेशीय व अत्यंत आकुंचित विधानें बिनधोक ठोकून देणें अगदीं अयोग्य आहे. आमच्या उपनेत्रांचा रंग हिरवा असल्यामुळें स्फटिक हिरवा दिसला म्हणून स्फटिकाचा रंग हिरवा आहे असें विधान ठोकलें तर तें जसें हास्यास्पद होईल, तसेंच अमुक संत महार, अमुक ब्राह्मण, अमुक विद्वान्, अमुक भक्त, अमुक राजकारणी, अमुक हिंदु, अमुक अमेरिकन, अमुक मुसलमान, इत्यादि विधानेंही हास्यास्पदच आहेत. जो खराच संत असेल तो सर्वव्यापक व अभेदरूपीच असला पाहिजे.

## संसारी माणसास उपदेश

आतां लोकांना भेद प्रतीत होतो व त्या भेदाचा लवकर ऱ्हास होत नाहीं म्हणून निरनिराळ्या परिस्थितींत असलेल्या लोकांना निरनिराळा उपदेश करणें संतांना अवश्य असतें. ज्याची विचारसरणी रात्रंदिवस प्रापंचिक विषयांत गढलेली असून ज्याला परमार्थाचा मुळींच कांहीं संस्कार झालेला नाहीं, अशा एखाद्या शिष्याला प्रपंच एकदम सोडून परमार्थमार्ग धरण्यास संत कधींच सांगणार नाहींत. कारण, तेवढी मात्रा त्याला न पचून उलट अपाय होण्याचा संभव असतो. म्हणून 'आधीं प्रपंच करावा नेटका। मग पहावें परमार्थविवेका॥' असेंच ते सांगतात. परंतु यावरून 'संसारसंगें सुख झालें। ऐसें देखिलेंना ऐकिलें॥' या त्यांच्या सर्वसाधारण उपदेशाला मुळींच बाध येत नाहीं. त्याचप्रमाणें हजारों शिष्यांपैकीं एक शिष्य सिंहासनाधिरूढ असल्यामुळें त्याच्या परिस्थितीला उपयुक्त असा उपदेश क्वचित् करावा लागला म्हणून कांहीं त्यांच्या 'ब्रह्मज्ञानेंवीण उपदेश। तो म्हणों नये विशेषाधान्येंवीण जैसें भूंस खातां नये' अशा सर्व साधारण नियमाला मुळींच बाध येत नाहीं.

## संताचें कर्तव्य

अलीकडे महापुरुषांच्या उदात्त व व्यापक तत्त्वांना ओढून ताणून आपल्या प्रस्तुत प्रापंचिक व एकदेशीय विषयांना जुळवून लावण्याचा प्रघात बराच पसरलेला दिसत आहे. ही आमची रंगीत आरशींतून पाहण्याची तऱ्हा नुसती अयोग्यच नव्हे तर तीपासून त्यांच्या धर्माच्या प्रसाराला बरीच अडचण येण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ श्रीसमर्थ रामदासस्वामींचे समग्र ग्रंथ ज्यांनीं लक्षपूर्वक वाचले असतील त्यांना श्रीसमर्थांचे कर्तव्य 'मुख्य हरिकथानिरूपण' च होतें याविषयीं मुळींच शंका राहणार नाहीं. त्यांच्या सबंध दासबोधांत आत्मज्ञानाचीच महती मुख्यत्वें करून सांगितली आहे. असें असून त्यांच्या क्वचित् प्रसंगीं एका राज्यधारी शिष्याला दिलेल्या राजकारणाच्या उपदेशावरूनच त्यांना राजकारणी ठरविणें अन्यायाचें होईल. उलट 'शहाणे करावे जन। पतित करावे पावन। सृष्टिमध्यें भगवद्भजन। वाढवावें॥' हेंच त्यांच्या सांप्रदायकांचेंहि कर्तव्य असलें पाहिजे. क्वचित् प्रसंगीं श्रीसमर्थांनीं जें राजकारण सांगितलें तेंसुद्धां कांहीं राजा व प्रजा यांत वितुष्ट पाडणारें नव्हतें. एका क्षत्रिय राजानें एका विवक्षित प्रसंगीं कसें

वर्तन ठेवावें, हाच त्यांच्या राजकारणोपदेशाचा रोख होता. म्हणून एखाद्या मुमुक्षूनें त्या रीतीचें वर्तन ठेविल्यास कदापि चालणार नाहीं. सर्व कर्तव्यांत भगवत्प्राप्तीचें कर्तव्य श्रेष्ठ आहे व तें ज्याचें ध्येय असेल त्यानें राजकारणासारख्या एककल्ली चळवळीचा त्यागच करणें अवश्य आहे. निंदाद्वेष–मत्सरादि दुर्विकारांचा नायनाट झाल्यावांचून भगवत्प्राप्ति होणें दुरापास्त असल्यामुळें, ज्या चळवळींत हे विकार प्रबल होण्याचा संभव उघड आहे तिच्यांत शिरकाव न करणें हें प्रत्येक मुमुक्षूचें कर्तव्य आहे, व तीपासून त्यांना परावृत्त करणें हें आधुनिक साधुसतांचें कर्तव्य आहे.

## श्री समर्थांचा कित्ता

श्री समर्थांनीं शिवाजीला राजकारण सांगितलें हें जसें आपण लक्ष लावून पाहतों, तसेंच त्यांनीं कल्याणस्वामी, उद्धवस्वामी इत्यादि हजारों लोकांना आध्यात्मज्ञानाच्या थोर पदवीप्रत आणून पोहोंचविलें हें आपण कां पाहात नाहीं ? राज्य, धन इत्यादि क्षुद्र विषयांच्या तृष्णेंत गुरफटून राहणें ज्यांना आवडत असेल त्यांनीं हवी तर राजकारणासारखी एकदेशीय दिशा पत्करावी; पण ज्यांना कांहीं तरी भक्तिज्ञानवैराग्याची चाड असेल त्यांनीं संसाराला लाथ मारून कडकडीत वैराग्यानें राहिलेल्या श्रीसमर्थांचा कित्ता गिरविला पाहिजे. श्रीसमर्थांना जर राजकारण संमत असते तर त्यांनीं एकादें राज्य प्राप्त करून घेण्याची खटपट करण्याच्या ऐवजीं अखंड ईश्वरचिंतन करून धर्मोपदेश करण्यांत वेळ कां घालविला असता ? यावरून धर्मस्थापना करणें हेंच त्यांचें कर्तव्य होतें, हें उघड आहे. ते राजकारणी होते हा त्यांच्यावर वृथा व मिथ्या आरोप आहे. उलट प्रजाजनांना तर त्यांनीं असेंच सांगितलें आहे कीः—

‘ कोणी एक ग्रामीं अथवा देशीं । राहणें आहे आपणांसी ॥
न भेटतां तेथल्या प्रभुसीं । सौख्य कैचें ॥
म्हणौन ज्यास जेथें राहणें । तेणें त्या प्रभूची भेटी घेणें ॥
म्हणिजे होय श्लाघ्यवाणें । सर्व कांहीं ॥ ’

प्रजाजनांचें वर्तन असेंच असलें पाहिजे. ‘ देव, दैशिक ( गुरु ), व देशाधिपति यांचे ठिकाणीं सप्रेम निष्ठा ठेवून ’ आपलें लोकोद्धाराचें पवित्र कार्य करणें, हें आधुनिक साधु संतांचें कर्तव्य आहे. मातापुत्र, पतिपत्नी, राजाप्रजा यांच्यामध्यें वितुष्ट पाडणें महत्पाप आहे. आपण हल्लीं ज्या परिस्थितींत आहों तीच परिस्थिति आपल्या आत्मोन्नतिकरितां इष्ट आहे हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. ईश्वराच्या येथें कांहीं अन्याय नाहीं. जें ज्याला इष्ट व योग्य आहे आहे तेंच त्याला तो देतो. सध्याच्या आपल्या स्वतंत्र सरकाराच्या द्वारें किंवा त्यांच्या सहकारित्वानें आपणांस सर्व प्रकारचें शिक्षण मिळून आपल्या राष्ट्राची उन्नति व्हावी, असा ईश्वरी संकेत दिसतो. म्हणूनच त्यांच्या देखरेखीखालीं ईश्वरानें आपणांस ठेविलें आहे. त्यांच्यासारख्या न्यायप्रिय स्वतंत्र सरकारचें आपणांवर छत्र आहे यावि

मानिले पाहिजेत. त्यांच्या अंमलाखालीं धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्याचा आपणास अनुभव घेण्यास मिळतो. हें आपल्या राज्यकर्त्यांचें औदार्य कांहीं लहानसान नाहीं. मुमुक्षूनें तर दोषकदृष्टि असूंच नये. दुसऱ्याचे गुण पाहून ते आपल्यांत आणण्याचा प्रयत्न करावा व दोष दिसल्यास ते आपणांत न यावे म्हणून खबरदारी घ्यावी. निंदाद्वेष-मत्सरादि विकारांचा सर्वथैव त्याग करून सार्वत्रिक बंधुप्रेम व एकमेकांवरील विश्वास व सलोखा वाढविण्याचा प्रयत्न करावा.

## चित्तशुद्धीचें महत्त्व

भगवत्प्राप्तीकरतां चित्तशुद्धि होणें अत्यंत आवश्यक आहे. जोंपर्यंत काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर इत्यादि दुर्विकारांचा नाश होत नाहीं तोंपर्यंत भगवत्प्राप्ति होणें अशक्य आहे. म्हणून हे विकार नाहींसे करणें हें अगत्याचें काम आहे. हे विकार नाहींसे करणें म्हणजेच चित्तशुद्धि करणें होय. राजकारणासारख्या प्रापंचिक विषयाकडे चित्त दिलें तर हे विकार नष्ट होणें तर एकीकडेच राहिलें, उलट त्यांचें प्राबल्य मात्र होईल. म्हणून ती दिशा सोडून ज्या दिशेनें त्या विकारांचा नाश करितां येईल ती दिशा पत्करावी. ही दिशा म्हणजे हरिकथाश्रवण, भगवन्नामसंकीर्तन, सर्वभूतीं भगवद्भाव अथवा विश्वबंधुत्व, श्रद्धापूर्वक धर्मग्रंथांचें अध्ययन व परोपकार होय. हरिभक्तीनें चित्त-शुद्धि होते हा सिद्धांत आहे. याविषयीं आधार हवा असल्यास खालील श्रीमद्भागवतांतील श्लोक पहावा:—

> ' यथा यथात्मा परिमृज्यते ऽ मत्पुण्यगाथा श्रवणा–भिधानात् ।
> तथा तथा पश्यति वस्तुसूक्ष्मं चक्षुर्यथैवांज–नसंप्रयुक्तम् ॥—
>
> —श्रीमद्भगवतस्कंध, ११.

अर्थात्, ज्याप्रमाणें डोळ्यांत अंजन घातल्यानें बारीक वस्तुसुद्धां दिसावयास लागते, तद्वत् माझ्या ( भगवंताच्या ) पवित्र कथांच्या श्रवणानें व कथनानें मन हळुहळू शुद्ध होतें व सूक्ष्म आत्मस्वरूप प्रकट व्हावयास लागतें.

हल्लींच्या काळांत रज व तम या गुणांची सरशी असल्यामुळें असत्यनिंदाद्वेष-मत्सरादि दुर्विकार प्रबल झालेले आहेत. जीवांना केवळ भौतिक उन्नतीकरितांच प्रयत्न करावेसे वाटतात. परमात्म्यासंबंधानें अज्ञान व अनास्था आहे. म्हणूनच याला कलियुग ( कलहयुग ) असें म्हणतात. पण नीट विचार केला तर याच वेळीं संतांचें कार्य जारीनें व्हावयास पाहिजे. संतांना उपकारासाठीं देह कष्टविण्याचें आपलें कार्य करण्यास हीच उत्तम संधि आहे. जितका रोग दुःसाध्य असेल तितकीच वैद्याची तो नाहींसा करण्यांत कुशलता अधिक. तसेंच जितकें पाप जास्त तितकें तें नाहींसें करून पतितोद्धार करणें जास्त श्रेयस्कर. पाप अतिशय झालें म्हणुन नुसता खेद करीत न बसतां आपली पराकाष्ठा करून पापांचें उन्मूलन करणें, व धर्मसंस्थापना करणें, हें संतांचे कर्तव्य

आहे. पद्मपुराणातर्गत श्रीमद्भागवत–महात्म्यांत श्रीभगवान् नारदांनीं श्रीभक्तिदेवीला सांगितलें आहे कीं:—

‘ कलिना सदृशः कोऽपि युगो नास्ति वरानने । तस्मिंस्त्वां स्थापयिष्यामि गेहे गेहे जने जने ॥
अन्यधर्मास्तिरस्कृत्य पुरस्कृत्य महोत्सवान् । तदा नाहं हरेर्दासो लोके त्वां न प्रवर्तये ॥

## खरा हरिदास कोण ?

या कलियुगासारखी संधि दुसरी कोणती मिळणार आहे असें वाटून श्रीनारदांना ज्याप्रमाणें घरोघरीं भक्तिज्ञानवैराग्याची स्थापना करण्याचा उल्हास आला, तसाच प्रत्येक आधुनिक संतास आला पाहिजे. श्रीनारदांनीं म्हटल्याप्रमाणें अशा वेळीं लोकांत भक्तीचा प्रसार जो करणार नाहीं तो खरा हरिदासच नव्हे !

श्रीएकनाथ स्वामींच्या पुढील अभंगवाणींतील संक्षिप्त उताऱ्यावरून संतांचा अवतारोद्देश अगदीं स्पष्ट होईल:—

‘ धर्माची वाट मोडे । अधर्माचा शीग चढे ।
तै आम्हां येणें घडे । संसारस्थिति ॥ १ ॥
आम्हां कां संसारा येणें । हरिभक्ति नामस्मरणें ।
जडजीव उद्धरणें । नामस्मरणें करुनी ॥ २ ॥
सर्व कर्म ब्रह्मस्थिति । प्रतिपादाव्या वेदोक्ति ।
हेंचि एक निश्चितीं । करणें आम्हां ॥ ३ ॥
नाना मतें पाखांड । कर्मठता अति बंड ।
तयाचें ठेंचणें तोंड । हरिभजनें ॥ ४ ॥

भावार्थ हा कीं, केवळ बाह्याचाररूप बनलेल्या कर्मप्रधान गोष्टींना महत्त्व न देतां भगवत्प्रेमरूपी आनंदाची महती सर्व लोकांना सारखी समजाविणें हाच भक्तीचा प्रसार करण्याचा प्रकार आहे.

हा मार्ग सर्वांना सारखा खुला आहे. यांत विवक्षित वर्ण अथवा जातींचाच केवळ अधिकार आहे असें नाहीं. मुमुक्षु हा वर्णाचा, जातीचा, देशाचा अथवा लिंगाचा असो, त्याला भागवतधर्म खुला आहे. तो ब्राह्मण असो, शूद्र असो, स्त्री असो, पुरुष असो, प्रजा असो, हिंदु असो, इंग्रज असो, पारशी असो, मुसलमान असो, कोणीही असो, त्याला भक्तिमार्गाची पूर्ण मोकळीक आहे. अशाच रीतीनें पूर्ण स्वार्थत्याग करून विश्वकुटुंबीय वृत्ति वाढवून वर्ण, जाति, लिंग, देश, पंथ इत्यादि भेदांचा तिरस्कार करून लोकांना विद्यादान देऊन सार्वत्रिक भगवद्भक्तीचा प्रसार करणें व तद्वारा जनतेला अक्षय्य प्रेमानंदाचा व पूर्ण आत्मज्ञानाच्या आनंदाचा आस्वाद करून देणें, हेंच या शतकांतील साधुसंतांचें कर्तव्य आहे,

———

# खुशालबाबांची भक्ति

*************************

**खुशालबाबा परम विठ्ठलभक्त होते. विठ्ठल आपल्या निष्ठावान् भक्तासाठीं काय वाटेल त्या लीला करील ! खुशालबाबासाठीं त्यानें काय काय केलें व त्याचे मनोरथ कसे पूर्ण केले ते या कथेंत वाचा.**

खानदेशांत फैजपूर या नांवाचें एक खेडेगांव आहे. राष्ट्रीय सभेची बैठक खेड्यापाड्यांतून भरवावी अशी कल्पना महात्मा गांधींच्या काळांत पुढें आली. तेव्हां त्या सभेच्या बैठकीसाठीं याच खेड्याची निवड करण्यांत आली होती. परंतु केवळ कॉंग्रेसमुळें फैजपूरची कीर्ति झाली नसून एका संतपुरुषाच्या वास्तव्यानें गांव त्यापूर्वीच पुण्यपावन होऊन राहिलेला आहे. तुकारामामुळें देहूला आणि ज्ञानदेवामुळें आळंदीला महत्त्व प्राप्त झालें. त्याचप्रमाणें खुशालबाबा या संतामुळें फैजपूरला महत्त्व प्राप्त झालें आहे.

ही दिडशें वर्षांपूर्वीची संतकथा आहे. त्याकाळीं तुळशीराम भावसार या नांवाचे एक धर्मनिष्ठ गृहस्थ तेथें रहात असत. त्यांच्या पत्नीचें नांव होतें नाजूकबाई. दोघेंही एकमेकांस अत्यंत अनुरूप व धर्मपरायण होतीं. लुगडीं पातळें रंगविणें हा होता त्यांचा पोटापाण्याचा व्यवसाय. त्या धंद्यांत चार पैसे इमानें इतबारें मिळवावयाचे व त्यांतच संसार चालवून जें उरेल त्यांत दानधर्म करायचा, परंतु तीं जगलीं होतीं तीं केवळ स्वतःचें पोट भरण्यासाठीं नाहीं. त्यांचें इतरांच्या दुःखाकडे व अडचणींकडे लक्ष असे. 'ज्यासी आपंगीता नाहीं त्यासी धरीं जो हृदयीं '—यालाच जगणें णतात ही जाणीव तुळशीरामाला पूर्णपणें होती.

अशा पुण्यवान् मातापित्याच्या घरीं जन्म घेणारा खरोखर पुण्यवान् असला ाहिजे. ईश्वराचें लक्ष अशा भाग्यवंताकडे लागून राहिलें असल्यास नवल नाहीं. देव भावाचा भुकेला. अशा ठिकाणीं देवाला ओढ लागून रहात असते. खुशालबाबा या घरांत जन्माला आले. बालपणापासून त्यांचें लक्ष देवभक्तीकडे लागून राहिलेलें असे. असें होत असतें कित्येकांच्या बाबतींत. मोठीं पुण्यवान् माणसें असतात तीं. खुशालबाबा लहानाचे मोठे झाले. वयाबरोबर त्यांची भगवद्भक्ति वाढत गेली. जगरहाटीप्रमाणें वडिलांनीं त्यांचा विवाह केला व त्यांच्यामागें संसाराचें बंधन लावून दिलें.

संसार हा मानलें तर बंधन व मानलें तर अध्यात्मांत अग्रेसर होण्याची शाळा. खुशालबाबांनीं आपल्या वडिलांप्रमाणें आपला संसार आदर्श बनविला. ते वारकरी

पंथांत सामील झालेले होते. त्यामुळें त्यांना पंढरीच्या वाऱ्या घडत असत. विठोबाची पंढरी म्हणजे त्यांचें महाक्षेत्र. त्यांचें सारें लक्ष पंढरीकडे व पंढरींतील विठोबाकडे लागून राहिलेलें असे. प्रामाणिकपणें उद्योगधंदा करायचा व पंढरीच्या वारीसाठीं चार पैसे शिल्लक टाकावयाचे. त्यांना पंढरीची वारी हें जीवनसर्वस्व होतें.

खुशालबाबा असेच एकदां पंढरीच्या वारीला गेले असतां विठोबाचें दर्शन घेऊन व तें डोळ्यांत भरवून रस्त्यानें जात होते. इतक्यांत एका दुकानांत त्यांना विठोबाची शुभ्र पाषाणाची मूर्ति दिसली. त्यांचें मन तेथेंच रमलें. दृष्टी त्या मूर्तीवर खिळली ती हालेनाच. अशी सुंदर मूर्ति आपल्याजवळ असली तर काय बहार होईल! रोजच्या पूजनात भगवंताची मूर्ति असावी तर अशी! पण काय बरं हिचें मोल असेल! तें आपणाला परवडेल का? विचारून तर पाहूं या!

अशा रितीनें खुशालबाबा स्वतःशींच विचार करीत तेथें बराच वेळ उभे होते. नंतर धीर करून त्यांनीं दुकानदारास त्या सुंदर मूर्तीची किंमत विचारली. ती ऐकून ते गर्भगळित झाले. त्यांचे हातपाय लटलट कापायला लागले. वाईट वाटलें; मूर्ति मनांत भरली, परंतु तिचें मोल देण्याएवढें सामर्थ्य आपल्यांत नसावें या विचारानें ते दुःखीकष्टी झाले.

ती विठ्ठल मूर्ति त्यांच्या डोळ्यांत भरली होती. ते तसेच पुढें निसटले व एका झाडाखालीं जाऊन देवाला आळवीत बसले. ‘भगवंता! मला एवढंसुद्धां सामर्थ्य असूं नये! किती मी हतभागी !! तूं गरिबांचा वाली ना? मग माझी इच्छा तूं पुरी नाहीं का करणार?’

त्यांच्यानें आपल्या मुक्कामाकडे जाववेना. ते परत त्या दुकानाकडे गेले. त्यावेळीं कोणी एक धनिक गृहस्थ दुकानदारानें सांगितलेली किंमत देऊन ती मूर्ति घेत होता. खुशालबाबा अत्यंत निराश झाले. आतां ती मूर्ति कसची आपणाला मिळणार! ते दुःखीकष्टी अंतःकरणानें तेथून निघाले आणि आपल्या निवासस्थानीं आले. त्यांना अन्नपाणी कांहीं सुचेना व गोड लागेना. ती मूर्ति व तें सुंदर ध्यान त्यांना सतत दृष्टीपुढें दिसूं लागलें. ते बेचैन झाले.

तीं सारीं माणसें एका धर्मशाळेंत उतरलीं होतीं. मूर्ति खरेदी केलेले गृहस्थ त्याच धर्मशाळेंत एका प्रशस्त जागीं रहात होते. त्यांच्याकडे खुशालबाबांची नजर होती. रात्रौ कीर्तन आटोपल्यानंतर त्या गृहस्थानें विठ्ठलमूर्ति एका बॅगमध्यें बंद करून ती आपल्या उशाजवळ ठेविली व ते झोपी गेले.

त्याच धर्मशाळेच्या एका कोपऱ्यांत खुशालबाबा झोपण्याच्या प्रयत्नांत होते. मनाला एकसारखी तळमळ व चुटपुट लागून राहिली होती. विठ्ठलाची ती मूर्ति डोळ्यांसमोर नाचत होती. कसली झोप येणार!

मूर्ति असलेली बॅग उशाशीं घेऊन झोपलेले गृहस्थ मात्र खुशाल घोरत पडलेले होते. भगवंताची नजर सर्वांवर सदासर्वकाळ असते. तशीच ती या दोघांवरही होती. मध्य-

रात्रींच्या सुमारास बॅगमधील मूर्ति बाहेर पडली व तिनें खुशालबाबांच्या उशाशीं आश्रय घेतला !! एक अद्‌भुत घटना होती ती ! परंतु भक्तांच्या बाबतींत भगवंत काय करील आणि काय नाहीं हें सांगतां येणें कठीण आहे.

खुशालबाबांचा जरा कुठें डोळा लागला आणि तेवढ्यांत त्याला एक गोड स्वप्न पडलें. विठ्ठल स्वप्नांत त्याला हाक मारून म्हणाले, 'अरे खुशाल ! असा खुशाल झोपलास कां ? तुझ्या भक्तिभावामुळें मी तुझ्याजवळ आलों आहे ! पहा तरी जरा डोळे उघडून !'

खुशालजींनीं ताडकन डोळे उघडले व चारी बाजूंस पाहूं लागले तों काय ! त्यांच्या उशाशींच विठ्ठलाची ती सुंदर मूर्ति खडी होती ! काय आनंद झालाय त्या भोळ्याभाबड्या मनाला ! कोण त्याचें वर्णन करूं शकणार आहे आणि कोणाच्या लेखणींत तें सामर्थ्य आहे !

ती मूर्ति मस्तकावर धारण करून खुशालबाबा तेथें नाचूं लागले. त्या मूर्तीला कुठें ठेवूं आणि कुठें नको असें झालें होतें त्यांना ! 'ब्रह्मानंदीं लागली टाळी । मग देहातें कोण सांभाळी !'

ज्यानें मूर्ति विकत घेतली होती तो तिचा मालक सकाळीं उठून बॅगमध्यें पाहूं लागला तों ती मूर्ति बेपत्ता झालेली पाहून त्याला आश्चर्याचा धक्का बसला. विचारांत पडला. इकडे तिकडे पाहूं लागला, शोधूं लागला. इतक्यांत कोणीतरी विठ्ठल! विठ्ठल! म्हणत स्वैर नाचत असल्याचें पाहून तो काय प्रकार आहे म्हणून जवळ जाऊं लागला ! पहातो तों काय? आपण विकत घेतलेली मूर्ति मस्तकावर धारण करून स्वारी नाचत आहे.

त्या नाचण्याचें त्या गृहस्थास नवल वाटलें व आश्चर्यहि वाटलें! एवढेंच नव्हे तर रागही आला! तो गृहस्थ खुशालबाबांचा हात पकडून त्यांच्याशीं झगडूं लागला. ते म्हणाले, 'माझा काय अपराध? मी काय करूं? मी नाहीं चोरली तुमची मूर्ति! ती माझ्याजवळ कशी आली मला काय ठाऊक!'

त्या गृहस्थाला तें कांहीं केल्या खरें वाटेना. बाबाकडून मूर्ति घेऊन तो आपल्या निवासस्थानीं आला व पुन्हा व्यवस्थित बॅगमध्यें मूर्ति कोंबून बॅगला भक्कम कुलूप ठोकलें.

देव का बंदीवासांत रहाणार! कसल्याहि कडेकोट बंदोबस्तांतील बंदिवासांतून त्यानें रातोरात गोकुळांत पलायन केलें नाहीं का? देव पैशांचा नाहीं तर भावाचा भुकेला ! भाव तेथें देव !

त्या धनिक गृहस्थाला त्या रात्रीं एक स्वप्न पडलें. त्याला आदेश मिळाला कीं, मला मस्तकावर घेऊन नाचणारा खुशालबाबा माझा परम भक्त आहे. माझ्यासाठीं त्यानें अन्नपाणी वर्ज्य केलें आहे. जा त्याच्याकडे आणि तुझ्या बॅगेंतील माझी ती प्रतिमा प्रेमादरपूर्वक त्याला अर्पण कर. त्यांतच तुझें कल्याण आहे. माझ्या शब्दावर विश्वास ठेव, अनमान करूं नकोस.

देवाचा आदेश ! तो कोण मोडूं शकणार आहे ! सकाळीं उजाडतांच तो गृहस्थ खुशालबाबांकडे मूर्ति घेऊन गेला व त्याला हात जोडून म्हणाला, बाबा ! माफ करा मला ! ही मूर्ति मी आपणास अर्पण करीत आहें. आपण कृपा करून तिचा स्वीकार करावा.

भगवंतानें बाबांची इच्छा पूर्ण केली, खुशालबाबा आनंदी अंतःकरणानें आपल्या गांवीं गेले व चार स्नेही मंडळींस आमंत्रण करून त्यांनीं समारंभपूर्वक विठ्ठल मूर्तिची प्राणप्रतिष्ठा केली. रोज पहांटे उठून स्नान करून बाबांनीं सतत तीन तास त्या मूर्तीचें पूजन भजन करण्यांत घालवावे. ती मूर्ति म्हणजे त्यांचें सर्वस्व होतें. त्यांनीं आपला कामधंदा सोडला नव्हता. सारे व्यवहार देवाच्या नांवानें चालू होते.

खुशालबाबा संसाराचा गाडा चालवीत होते, परंतु त्यांचें मन रमलें होतें विठ्ठलाच्या भक्तींत. जें करायचें तें विठ्ठलासाठीं !

खुशालबाबांना एक कन्यारत्न झालें होतें. ती विवाहयोग्य होतांच तिचा विवाह करणें प्राप्त होतें. विवाह म्हटला म्हणजे पैशांचा प्रश्न आला ! आणि त्या पैशाशीं तर त्यांचें वाकडें होतें. काय करणार ? गरजेपुरते दोनशें रुपये गांवांतील एका व्यापाऱ्याकडून उसने घेऊन त्यांनीं कन्येचा विवाह केला. त्या जबाबदारीतून बाबा मोकळे झाले. परंतु दोनशें रुपये फेडण्याची जबाबदारी शिरावर होती.

रक्कम फेडण्याची मुदत संपली व व्यापाऱ्यानें पैशांची मागणी केली. खुशालबाबाजवळ होतें काय द्यायला ? तगादा सुरूं झाला म्हणून दोन दिवसांची मुदत मागून घेतली. त्या मुदतींत रक्कम नाहीं दिली तर खुशालबाबांच्या घराचें लिलांव होणार होतें.

बाबा चिंतेंत होते. परंतु भगवंताच्या पाठीराखेपणावर त्यांची संपूर्ण श्रद्धा होती. एक दिवस मागें पडला व दुसरा दिवस उजाडला. खुशालबाबा देवपूजेंत व भजनांत मग्न होते.

दुपारच्या प्रहरीं एक गृहस्थ मुनीमाच्या वेषांत त्या व्यापाऱ्याकडे गेले व म्हणाले, मी खुशालबाबांचा मुनीम आहे ! तुमचे दोनशें रुपये त्यांनीं व्याजासह दिले आहेत. हे घ्या आणि मला पोंचपावती द्या.

व्यापाऱ्यानें रक्कम मोजून घेतली व पावती लिहून दिली.

वेळ मिळाला म्हणजे गीतेचा एकेक अध्याय काढून वाचायचा हा बाबांचा नित्य परिपाठ होता. त्याप्रमाणें बाबांनीं गीतेची पोथी उघडली व पाहातात तों काय ? त्यांत त्याच तारखेची सर्व रक्कम पोहोंचल्याची लक्ष्मीचंद व्यापाऱ्याच्या सहीची पावती होती.

खुशालबाबा जें कांहीं समजायचें तें समजून चुकले ! भक्तासाठीं भगवंताला केवढी ही तसदी ! बाबांचें अंतःकरण प्रेमभावानें भरून आलें. ढळढळां रडले. देवा ! कोणत्याही रूपानें असो, त्या व्यापाऱ्याला तूं दर्शन दिलेंस आणि मी मात्र प्रत्यक्ष दर्शनाला महाग झालों ! कधीं भेटणार तूं मला ! आणि त्यानंतर भक्तवत्सल विठ्ठलानें एका पुण्य दिवशीं खुशालबाबांना प्रत्यक्ष दर्शन देऊन त्यांची इच्छा पूर्ण केली.

---

# अंगीकृत कार्यांत यश कसें मिळवाल ?

********************************

**एका वेळीं एकच कार्य हातीं घेऊन सारी शक्ति त्यासाठीं खर्च केल्यानें त्यांत यश मिळण्याची खात्री असते. मनाची शक्ति द्विधा झाली कीं यश दूर पळालें म्हणून समजा. जें कार्य हातीं घ्याल तें देवाचें व देवासाठीं करावयाचें, या भावनेनें त्याचा पिच्छा पुरवा.**

आपली मानसिक शक्ति वाटेल तशी वापरल्यानें ती सुफलदायी होत नाहीं. कोणत्याही हातीं घेतलेल्या कार्यांत यश मिळवायचें तर मनाची एकाग्रता व्हावी लागते. आपण एखादें काम मन लावून एकतानतेनें करतों व त्यांत सुयश मिळवितों. त्यामुळें आपला उत्साह दुणावतो. अनेक कामें शिरावर घेऊन तीं पार पाडावीं असा हुरूप वाटूं लागतो. नाना संकल्प आपण करतों आणि ते पार पाडण्यासाठीं जिवाचें अगदीं रान करतों. हातीं काय येते ? काय येणार ? सर्वत्र अपयश ! मनुष्य कितीहि सामर्थ्यवान् असो, तो एकाच वेळीं अनेक कामांची जबाबदारी शिरावर घेऊन ती यशस्वी रीतीनें पार पडूं शकत नाहीं. एकापेक्षां अधिक कामें हातीं घ्यायचीं, तीं कंटाळून सोडावयाचीं, पुन्हा दुसरीं कामें हातीं घ्यायचीं ! त्याचाहि तोच नमुना. मन एकावेळीं एकाच कामाची घडगत लावू शकतें हें आपण समजलें पाहिजे. अनेक कामें एकाचवेळीं पार पाडतां येणें शक्य नाहीं कांहीं. कामें अशीं असतात कीं, ती एकमेकांशीं सहकार करूं शकत नाहींत. मन द्विधा होतें. ते दोन वेगवेगळ्या मार्गांनीं विचार करूं लागतें. शक्ति विभागली जाते आणि शेवटीं काय ? दोन्हीं कामें कशीबशीं तडीला लागतात. तडीला लावणें हें उद्दिष्ट नसून हातीं घेतलेलें काम संपूर्णपणें पार पाडणें हें आपलें उद्दिष्ट असतें किंवा तें असावें.

## शक्तीचा उपव्यय

आपल्या मनाला एकाच कार्याशीं संलग्न होण्याचा आदेश मिळाला पाहिजे. अनेक कार्यांचे मनोरथ मनांत रचणें म्हणजे आपल्या तुटपुंज्या शक्तीचा नाश करण्यासारखें व शक्ति अनाठायीं खर्च करण्यासारखें आहे. मनांत जेव्हां असंख्य संकल्प गर्दी करून सोडतात तेव्हां समजावें कीं, या भाऊगर्दीत आपला निभाव लागणें अशक्य आहे. आपली शक्ती अमर्याद नसते. ती ठराविक प्रमाणांत असते.

मनांत कार्यासंबंधी अनेक संकल्प घोळूं लागले म्हणजे एकेकासाठीं आपण विचार करूं लागतों. एकासंबंधीं विचार संपतो न संपतो तों दुसरा विचार, मग तिसरा विचार अशी विचारधारा सुरू होऊन त्यांत हातीं कांहीं लागत नाहीं. सारे विचार वहात वहात नाहींसे होतात. शेवटीं हातीं कांहीं लागत नाहीं. त्यामुळें आपल्या ठायीं

जो आत्मविश्वास उत्पन्न झालेला असतो तोहि नाहींसा होऊं लागतो. मनाला थकवा आल्यासारखें वाटूं लागतें. मनाची प्रसन्नता नाहींशी होते. मग तुम्हीं काय करूं शकणार ?

कोणतेंहि कार्य हातीं घेऊन तें करीत असतांच त्यांत गोडी वाटली पाहिजे. त्यांत आपलें सर्वस्व ओतावें असें वाटलें पाहिजे. तें काम करीत असतां मन कसें प्रसन्नतेनें भारावून गेलें पाहिजे. हें केव्हां घडतें ? मन एकाच गोष्टीच्या विचारांत गुंतलेलें असेल तेव्हां; एकाच कार्याचा ध्यानीं मनीं ध्यास लागून राहिला पाहिजे. उठतां बसतां जेवतां खातां तो एकच विचार, त्या एकाच कार्याचें चिंतन. एकाग्रता यालाच म्हणतात. ती एकाग्रता साधतां आली व ती पुढें सतत चालूं ठेवतां आली म्हणजे तुम्हीं त्या कार्यांत यश मिळवूं शकाल हें निश्चित होय. तेव्हां एका वेळीं एक काम एक विचार.

## जुलमाचा राम राम नको

काम एकाग्रतेनें करीत राहिल्यानें आपली मानसिक शक्ति वृद्धिगत होते व कधीं कधीं तिची खर्चीही होतें. वृद्धि केव्हां होते ? जेव्हां हातीं घेतलेल्या कार्याबद्दल आपल्या मनांत आत्यंतिक आवड उत्पन्न झालेली असते, त्यांत गोडी वाटत असते तेव्हां कितीही काम केलें तरी उत्साहाची खर्ची न होतां तो बाढत जातो, आणि मनाच्या शक्तीची खर्ची केव्हां होतें ? जेव्हां एखाद्या कामाचा आपणास भार वाटूं लागतो, तें करतांना कंटाळा वाटूं लागतो व जेव्हां तें आपण जुलमाच्या रामरामाला करीत असतों तेव्हां, जुलुमाचा रामराम हा मनावरील भार जड करणारा व प्रेमाचा, आवडीचा रामराम हा मनावरील भार एकदम हलका करणारा आहे. तसेंच कोणतेही काम घाईघाईनें करूं लागल्यास त्याचा विनाश ठरलेला असतो. त्याबरोबर मनाला भारी थकवा येतो तो वेगळाच.

आपल्या पुढें वेळोवेळी अनेक कामें येतील. तीं येतच रहातील, म्हणून का आपण आलेल्या सर्व कामांचा भार आपल्या शिरावर घ्यायचा आहे. अशा रीतीनें एक ना धड भाराभर चिंध्या या न्यायानें आपण अपयशाला पाचारण करीत असतों. आपल्या समोर अनेक कामें आलीं तरी आपणास आवडणारें जरूर करण्यासारखें व तें केलेंच पाहिजे असें एकच कार्य हातीं घेतलें पाहिजे.

## एकच संकल्प

महत्त्व कोणत्या कार्याला द्यायचें हें ज्याचें त्यानें ठरवायचें असतें, आणि एकदां ठरविल्यानंतर मग मागेंपुढें न पहातां सर्व शक्ति, सारा उत्साह त्याच कार्यासाठीं खर्च करण्यांत आला पाहिजे. एक हातचें काम मध्येंच सोडून दुसरीकडे वळणें केवळ वेडेपणाचा बाजार म्हणावा लागेल. असें कोणीही करूं नये. मनांत संकल्प, विचार नानाविध येतील, परंतु त्या सर्वांना थारा न देतां एकाच संकल्पाला व एकाच

विचाराला थारा देऊन त्याचा अहोरात्र पिच्छा पुरविणें, यांतच संकल्पसिद्धि सामावलेली असते.

कार्यसफलतेच्या बाबतींत आणखी एक गोष्ट लक्षांत बाळगण्यासारखी आहे. जें काम करण्यासाठीं हातीं घ्यावयाचें तें निष्काम वृत्तीनें. ईश्वरासाठीं म्हणून तें ईश्वरदत्त आहे या भावनेनें, त्यासाठीं मन लावून करावयाचें, व तें त्यालाच अर्पण करावयाचें. लाभाची, लोभाची इच्छा बाळगावयाची नाहीं; अशा पवित्र व समर्पण भावनेनें हातीं घेतलेलें कार्य यशस्वी झाल्याशिवाय केव्हांही रहाणार नाहीं.

---

श्री रामचंद्र हा आम्हां भारतवासीयांना महान आदर्श आहे. रामनाम हाच आमचा महामंत्र आहे आणि रामनामामृत हेंच आमच्या सर्व दुःखाचा, आपत्तीचा व रोगांचा नायनाट करणारें अमृत आहे. धर्माची म्हणजे रामाची प्राप्ति करून घेण्याचें एकमेव साधन म्हणजे रामनाम. तें सतत घेण्याचा छंद आम्हांला लागूं दे.

—कांचीचे श्रीशंकराचार्य

जीझस ख्राईस्टला विचारण्यांत आलें कीं, सर्वांत पवित्र कृत्य कोणतें ! तो म्हणाला, सतत देवासाठीं व देवाच्या नावानें प्रत्येक गोष्ट करीत रहाणें व कोणाहीकडून स्तुतीची व प्रशंसेची किंवा प्रसिद्धीची अपेक्षा न बाळगणें.

---


MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लीनिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ ( मालक : एस्. व्ही. प्रधान

# ईश्वर सर्वत्र आहे

**ईश्वराचें वास्तव्य प्रत्येकाच्या अंतःकरणांत आहे. साधुसंत, वेद, उपनिषदें हेंच अनादि काळापासून सांगत ओरडत आहेत. हें जाणणें म्हणजेच ईश्वराची ओळख होणें, भगवंताचें दर्शन घडणें. परंतु हें तत्वज्ञान माहित असून आम्हीं त्याला दुरावलों आहोंत. म्हणून भांडण-तंटे, युद्धें व मारामाऱ्या.**

उपनिषदांत कांहीं वाक्यें अशीं आहेत कीं, त्यांतील एकेका वाक्यावर एकेक ग्रंथ नव्हे अनेक ग्रंथ लिहावे.

**‘ ईशावास्यमिदं सर्व यत्किंच जगत्यां जगत् ’**

या जगांत जें जें कांहीं आहे तें सर्व ईश्वरमय आहे. सर्वांत ईश्वर ओतप्रोत भरून राहिलेला आहे.

त्याचप्रमाणें आपले सर्व ग्रंथ व सारे संत महात्मे पुन्हा पुन्हा जोरजोरानें सांगत आहेत कीं, स्वतःमध्यें व इतरांमध्यें भगवंताला पहा सर्वांत मी आहे, सर्वांचा आत्मा एकच आहे. तो अक्षय समरूम एकसारखा व अव्यक्त आहे. त्या परमात्म्याशीं एकरूप व्हा, एकतानता साधा. ती एकत्वाची अनुभूति घ्या. भगवंत माझ्याहून भिन्न नाहीं. तो आणि मी एकच आहोंत या जाणिवेनें वागा. एक विचारी मित्र विचारतात कीं, अशारीतीनें एकतानतेचा अनुभव घ्यायचा अर्थ तरी काय? अशा अनुभवाची जरूरी काय? सर्वांचा आत्मा व परमात्मा जर एक आहे तर मग संसारांत सर्वच विषमता कां दिसून येते? परस्पर संघर्ष व तंटे–भांडणें मग कां बरें होतात?

**एकतानता झाली पाहिजे**

या प्रश्नाचें उत्तर त्या प्रश्नांतच सामावलेले आहे. ज्या प्रकारच्या एकतानतेची ऐक्याची अपेक्षा करण्यांत येते तें ऐक्य साधलें गेलेलें नाहीं म्हणून संघर्ष, म्हणून तंटेभांडणें व म्हणून विरोध. सभोंवार पाहिलें असतां सर्वत्र लोक तंटेभांडणें करतात, शिव्यागाळी चालू आहेत. युद्धें, झगडे होत आहेत. मारामारी, खटले हे सारे प्रकार चालूच आहेत. राष्ट्राराष्ट्रांत युद्धें कां होतात? लोक खून मारामारी करण्यास कां प्रवृत्त होतात? कांहीं गरीब, कांहीं श्रीमंत, कांहीं दुःखी, कांहीं सुखी, असा हा भेदभाव समाजांत कां आढळून येतो? या जगांत सर्वत्र सर्व बाबतींत पराकाष्ठा झालेली दिसून येते. पराकाष्ठा याचा अर्थ अगदीं शेवटचें टोक गांठण्याची स्थिति. कांहीं ठिकाणीं सुखाची परमावधि तर कांहीं ठिकाणीं दुःखातिरेकाची परमावधि! कांहीं ठिकाणीं प्रेमाची परमावधि तर कांहीं ठिकाणीं द्वेषाची परमावधि! कांहीं ठिकाणीं ज्ञानाची परमावधि तर कांहीं ठिकाणीं अज्ञानाची परमावधि! आणि परमावधि प्रत पोहोंचलेल्या या

दोन परमावधींची टोकें साधणें फार कठीण असतें. ती सहसा साधलीच जात नाहींत म्हणून आपणांस एकतानताच दिसून येत नाहीं.

ईश्वरासंबंधींचें ज्ञान किंवा आत्मज्ञान म्हणजे एक हास्यास्पद गोष्ट आहे असें पुष्कळांस आजकाल वाटतें. ब्रह्मज्ञान तें काय ! त्याचा कसला विचार करायचा ? श्रद्धा, ही भावनाच अंतःकरणांत नाहीं. लोक नाना प्रकारच्या विचारांनीं बहकून गेले आहेत. त्यांच्यांत स्थिरपणा नाहीं, शांतपणा नाहीं, कांहीं नाहीं, त्यामुळें कोणताही प्रश्न सुलभतेनें न सुटतां तो गुंतागुंतीचा होऊं लागला आहे. संस्कृतींचा संघर्ष, संपत्तिवाल्यांचा व ती नसलेल्यांचा संघर्ष. असे एक ना दोन कितीतरी संघर्ष चालू आहेत.

मी आणि माझें हीच भावना. कोणाशींही ऐक्य जोडायचें नाहीं. दुसऱ्यांची चिंता करायची नाहीं. ही द्वैत भावना सर्वत्र बळावलेली आहे. असें कां होत आहे याची जाणीव सर्वांना आहे; परंतु तिचा कांहीं उपयोग नाहीं.

अहो ! परंतु ईश्वराशीं एकत्वाचा संबंध जोडल्यानें सर्वप्रकारच्या बिकट प्रश्नांतून आमची कशी काय सुटका होणार आहे ?

गीतेंत भगवंतांनीं एका श्लोकांत याचें सुंदर विवरण केलें आहे.

**आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।**
**सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥**

जो कोणी सर्वत्र आपला आत्मा पहातो, सर्वजण आपल्यासारखेच आहेत, आपलींच विविध स्वरूपें आहेत, सर्वांचें सुखदुःख तेंच आपलें सुखदुःख असें मानतो, दुसऱ्यांचें दुःख तें आपलेंच दुःख असें मानतो तो परमयोगी होय असें समजावें.

**कोणी कोणाचा द्वेष करायचा ?**

सर्व लोक एकाच आत्मारामाचे—आत्म्याचे अंश आहेत, माझ्याठायीं जो आत्मा वास करीत आहे. तोच सर्वांतर्यामी आहे असें मानतो, जसा मी मला मानतो, जसा मी मला आवडतो, तीच गत इतरांची आहे. असें जो समजतो व मग त्याच्यांत व माझ्यांत फरक तो कोणता राहिला ? मग कोणी कोणाचा द्वेष करायचा, कोणी कोणाचा मत्सर करायचा, कोणी कोणाशीं चढाओढ करायची ? त्याची जरूरीच कुठें राहिली ! दुसऱ्याचा द्वेष करायचा म्हणजे स्वतःचाच द्वेष करायचा ?

अशी एकात्मभावना निर्माण झाल्यावर कोण कोणाचा मत्सर करील, कोण कोणाशीं झगडेल ? कोण कोणाचा अपहार करील ? मग या जगांत विषमता, संघर्ष व झगडे कसे होतील !

मनुष्य कधीं अंतर्मुख होऊन या एकत्वाची जाणीव करून घेईल व तदनुरूप वागेल तर आपणांस सर्वत्र प्रेमाचें बंधुभावाचें नंदनवन फुललेलें नाहीं का दिसणार ? आमची दृष्टी आंत जातच नाहीं. बाहेर बाहेर भटकते; बाहेरचे तेवढें पहात आहे व पदोपदीं गोत्यांत सांपडत आहे.

आपल्याप्रमाणें सर्वत्र पहाण्याची दृष्टि येणें म्हणजे परमात्मयोग साधण्यासारखें आहे. त्यासाठीं आम्हीं धडपड करावयाची आहे. तेंच आमचें एकमेव लक्ष्य व ध्येय

असलें पाहिजे. समत्वयोग हा आचरणांत आणण्यासाठीं आहे, बोलण्यासाठीं नाहीं. तो एकट्यासाठीं नाहीं तर सर्वांसाठीं, सर्वांनीं आचरणांत आणण्यासाठीं आहे. सर्वांशी प्रेमभावानें वागण्याची ही गोष्ट आहे. जो तसा वागणार नाहीं, त्याला ठोकरा खाव्या लागतात व लागत आहेत.

## ही महान् साधना आहे

सर्वांशीं एकता साधणें एकात्म भावनेनें पहाणें व तद्नुरूप व्यवहार करणें ही एक साधना आहे. जसा मी तसाच दुसरा. माझ्यांत व इतरांत भेद कांहीं एक नाहीं. सारे माझ्यासारखे. जसा मी तसा परमात्मा. माझ्यांत व इतरांत भेदभाव मुळींच नाहीं. ही भावना अंगीं बाणल्यावर मग द्वेष, मत्सर, राग कशाला रहातील ?

आत्मसाक्षात्कार किंवा परमात्म स्वरूपाचें दर्शन तें याहून भिन्न का आहे ? जगांत जन्माला येऊन आम्हांला जर कांहीं साधावयाचें असेल तर तें निःसंशयपणें हेंच होय.

काय हो ? ईश्वर किंवा परमात्मा दर्शनाची तुमची कल्पना तरी काय आहे ? तुम्हीं एकांतांत नाक तोंड दाबून स्वस्थ बसलेत किंवा आणखी कांहीं कष्टतर तपस्या केलेत म्हणजे मग परमात्मा तुमच्यापुढें येऊन उभा राहील अशी का तुमची समजूत आहे ? साफ खोटी आहे ही समजूत ! त्यांत सत्याचा व सार्थकतचा लवलेशही नाहीं.

हा दिव्याखालीं अंधार आहे. जें तुमच्याच ठायीं आहे तें तुम्हांला दिसत नाहीं. त्याचें आकलन होत नाहीं तें दुसऱ्या ठिकाणीं तुम्हीं कसें पहाणार ? स्वतःला ओळखा, स्वतःशीं व इतरांशीं आत्मौपम्येन पहा. म्हणजे तुम्हांला देवत्त्वाची गुरुकिल्ली आढळून येईल.

## हा केवळ दांभिकपणा आहे

या जगांत, आपल्या सभोंवार सर्वत्र परमात्मा आहे. सभोंवारच्या साऱ्या लोकांवर प्रेमभाव ठेवणें, प्रेम करणें म्हणजेच भगवंतावर प्रेम करण्यासारखें आहे. सर्वत्र आपला आत्मा पहाणें, आत्मदर्शन करणें म्हणजे भगवंताचें दर्शन घेणें. परमात्मा आपल्यापासून भिन्न किंवा वेगळा नाहीं आपल्यासारख्या आपल्या बंधूचा शेजाऱ्याचा द्वेष करावयाचा, त्यांचा मत्सर धरावयाचा व मी परमात्म्याची भक्ति करीत आहे व त्याला आळवित आहें असें म्हणावयाचें, हा सारा प्रकार घातक, दांभिक खोटा, आहे. त्यांत कांहीं तथ्य नाहीं; तशानें तुम्हांला देव भेटणार नाहीं. तो चार पावलें दूर जात राहील हें पक्के समजा.

परमेश्वराचें स्वरूप विराट आहे. तो सर्वांतर्यामी वास्तव्य करून राहिला आहे हेंच त्याचें विराट स्वरूप होय. तुम्ही आपल्या समोरच्या माणसाला आपल्याप्रमाणें प्रेमभावानें पाहू शकत नाहीं मग परमात्म्याचे तें विराट रूप तुम्हांला कसें बरें आकलन होणार ? म्हणूनच म्हटलें आहे कीं, **'ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्'**

जें सर्व कांहीं आहे तें सारें ईश्वरमय आहे. या परमात्मदर्शनांत मी आणि तूं, माझें आणि तुझें हा भेदभाव बिलकूल नाहीं हें समजून घ्या आणि तें आचारणांत आणण्यासाठीं झटा.

# सर्पापासून दूर रहा !

श्री राकृष्ण परमहंस यांच्या बोधवचनांस श्री. सी. राजगोपालाचारी यांनीं सुंदर पेहेराव देऊन त्यांना उपनिषदांचा दर्जा प्राप्त करून दिला आहे. त्या श्री. रामकृष्ण उपनिषदांचा हा चौथा हप्ता आहे.

### मी जबाबदारींतून मोकळा झालों

कोणी एक बडा व्यापारी एकदां श्री रामकृष्ण परमहंस यांच्याकडे आला आणि म्हणाला, "महात्मन् ! मी माझी सर्व मालमत्ता माझ्या कुटुंबियांच्या नांवें करून आतां मोकळा झालों आहे. मी रोजगार धंदाहि सोडून दिला आहे. असें असूनहि भगवंतानें मला भेट दिली नाहीं. याचें कारण काय बरें असावें ? सर्वस्वाचा त्याग केल्यानें देवाची भेट होते असें लोक सांगतात !

श्रीरामकृष्ण म्हणाले, एखादें तेलानें भरलेलें जुनेंपुराणें भांडें असतें. त्यांतील तेल दुसऱ्या एखाद्या भांड्यांत ओतलें तरी त्या भांड्याच्या तळाशीं थोडें तरी तेल चिकटून रहातेंच कीं नाहीं ? दीर्घकाळ त्या भांड्यांत तेल राहिल्यानें तें सारें वितळून बाहेर जात नाहीं. भांडेंसुद्धां साफ स्वच्छ करतां येत नाहीं. तेलाचा वासही नाहींसा होत नाहीं. त्याचप्रमाणें तूं जें कौटुंबिक जीवन जगलास त्याचा मागमूस आजिबात कसा बरें नाहींसा होईल ? तो सहजासहजीं नाहींसा होण्यासारखा नसतो. तूं आपली सर्व मालमत्ता कुटुंबीजनांस देऊन टाकिली असशील; परंतु तुझ्या मनांत अनेक वर्षांचे जे लागेबांधे बद्धमूल होऊन राहिले आहेत, ते सहजासहजी कसे बरें पुसटले जातील ?

### सर्वत्यागानें संन्यासी होत नाहीं

आमच्याजवळ जें कांहीं आहे तें दुसऱ्यांस देऊन टाकल्यानें आम्हीं संन्यासी बनूं शकत नाहीं. व्यवस्थापक या नात्यानें चारी बाजूंना लक्ष पुरविणें, हें दगदगीचें काम असतें. त्यांतून सुटका करून घेण्याच्या दृष्टीनें हें ठीक असतें; परंतु संपत्तीचे, नात्यागोत्याचे, सुखोपभोगाच्या लालसेचे बंध तोडणें महा कठीण आहे. या बंधनांतून मुक्त होऊन देवाची अनन्यभावें भक्ति करण्याची ज्ञानगंगा जवळ आणणें ही सहजसाध्य गोष्ट नाहीं.

अंतःकरणांत सर्वस्व त्यागाची खरीखुरी भावना जागी झाल्याशिवाय वरकरणी त्यागाचा काय बरें उपयोग ? मी अमूक गोष्टीचा त्याग केला; आतां कसें होईल ? अमक्या तमक्याचें काय होईल ! लोक मला काय बरें म्हणतील ? मी काय केलें हें ! असल्या विचाराच्या गोंधळांत सांपडावयाचें व त्या जाळ्यांत अडकविणारा तो कसला आला आहे त्याग ?

## सर्पांना फार जपलें पाहिजे

ठायीं ठायीं सर्पांची बिळें असलेल्या घरांत आपण वावरत असतों. सर्पांपासून आपलें रक्षण व्हावें यासाठीं आत्यंतिक काळजी घेणें जरूर असतें. सुखोपभोग व लोभ यांचे महाविषारी सर्प जेथें वारंवार फडा वर करताहेत अशा या घरांत वावरत असतां आपण कमालीची काळजी घेतली पाहिजे. काळोखांत असलेल्या आपल्या बिळांतून विषारी सर्प एकाएकीं बाहेर डोकावतो व कधीं दंश करून आपला प्राण घेतो हें जसें समजत नाहीं त्याचप्रमाणें लोभ व सुखोपभोगलालसा कधीं आपल्यावर झडप घालतील व अचानकपणें कधीं आपणास खड्डयांत लोटतील हें समजणें कठीण असतें. आमच्यांतील निदान शहाण्यासुरत्या माणसांनीं हें जाणून स्वतःवर अखंड पहारा ठेविला पाहिजे. तरच आपली सुटका आहे. देवाचें नामस्मरण, देवाची आठवण आपणांस अखंड होत राहिली पाहिजे. जुन्याकाळीं आपल्या खेड्या-पाड्यांतून कुठें विषारी सर्प आढळून आला तर माणसें मंत्र जपत असत कीं हे भगवंता ! या सर्पाची दिशा बदलूं दे व याला फडा वर केल्याशिवाय मागेच्या मागे जाऊं दे.' तो साप नंतर आपल्या मार्गानें निघून जात असे. आपल्या अंतःकरणांत सुखोपभोगाची जी लालसा वारंवार डोकावते ती विषारी सर्पाप्रमाणें समजावी. तिच्या आहारीं आपण मुळींच जातां कामा नये. तिच्यापासून नेहमीं चार पावलें दूरच राहिलें पाहिजे. मी शहाणा आहें, मला सारासार विचार आहे. मला भीति कशाची ? थोडें सुख चाखलें म्हणून त्यांत काय बिघडलें ? त्यामुळें माझें कसलें नुकसान होणार आहे ? मी मर्यादाति-क्रम करणार नाहीं. मर्यादेंत राहिलें म्हणजे झालें. हा विचार वेडेपणाचा आहे. सर्पाला तुम्हीं आपल्याजवळ थारा दिला तर तो कधीं तरी दंश केल्याशिवाय रहाणार नाहीं, हें निश्चित समजा.

## एका धनिकाची इच्छा

कोणी एक धनिक गृहस्थ श्रीरामकृष्णाजवळ जाऊन म्हणाला, 'आपणांस एखादी मोठी रक्कम द्यावी असें मला वाटूं लागलें आहे. हा चेक मी बरोबर घेऊन आलों आहें. याचा कृपा करून आपण स्वीकार करावा व आपले नित्याचे जे कांहीं खर्च असतील ते भागवावे.

त्या धनिक गृहस्थानें अत्यंत सद्धेतूपूर्वक ही विनंती केली; परंतु श्रीरामकृष्णांना ती पसंत पडली नाहीं. ती विनंती नाकारून ते म्हणाले, ' नको रे बाबा ! तुझी विनंती मीं मान्य केली तर मी तिच्यांतच गुंतून जाईन. सदासर्वकाळ तोच विचार मला सता-वीत राहील. तुझ्या त्या द्रव्यांत माझें मन नेहमीं गुंतून राहील; आणि सैरावैरा भटकत राहील. तेव्हां तुझी विनंती मला मान्य करतां येत नाहीं.

## धनिकाचा चिवटपणा

तो धनिक भारी चिवट होता. त्या उत्तरानें तो निराश झाला नाहीं. तो पुन्हा विनवणीच्या सुरांत म्हणाला, " जो खरोखर मदत करण्यास लायक त्याला मी मनापासून मदत करूं इच्छितों. माझ्या त्या इच्छेआड तुम्हीं कां बरें येतां ! तुम्हीं

द्रव्याला मुळींच शिवूं नका. तुमच्या नेहमींच्या गरजा योग्य प्रकारें भागविल्या जाव्या असें मला वाटतें. तेव्हां तुमच्या एखाद्या नातलगाच्या नांवावर मी कांहीं रक्कम टेवतों. निदान या योजनेला तरी आपण संमती द्यावी."

हीही विनंती श्री रामकृष्णांनीं फेटाळून लावली. ते म्हणाले, "तुमच्या पहिल्या व या दुसऱ्या सूचनेंत फरक तो कोणता? सत्याशीं लपंडाव खेळतां येईल कां? समजा कीं मी सरळ तुमच्याकडून द्रव्य न स्वीकारतां, ज्या दुसऱ्या कोणाच्या तरी स्वाधीन तुम्हीं द्रव्य करूं इच्छितां, त्याच्याकडून मी घेतलें तरी त्यांत फरक तो कसला? मग त्या इसमाकडे किती पैसे आले किती खर्च झाले व किती शिल्लक राहिले याच विचारांत मी गुंतून जाणार नाहीं का? अशा रीतीनें तें तुमचें द्रव्य मला सदासर्वकाळ सतावीत रहाणार नाहीं का? छे छे; अशाप्रकारच्या योजनेला मी केव्हांही संमती देऊं शकत नाहीं. तुमचा पैसा मला मुळींच नको.

**आणखी एक पर्याय**

आणि इतकें सांगूनहि तो धनिक आपला हेका कांहीं केल्या सोडीना. या नाहीं त्या मार्गानें त्याला आपली इच्छा पूर्ण करून घ्यायची होती. मग तो सांगूं लागला, 'महात्मन! हें पहा कीं, तुम्हांला कशाचाहि लोभ नाहीं. तुम्हीं अगदीं निरिच्छ आहांत. पाण्यावर जसें तेल अलिप्तपणें तरंगत असतें तसेंच तुमचें अंतःकरण आहे. अशा तुमच्यासारख्या थोरानें कां म्हणून भय बाळगावें? तुम्हींच सांगितलें आहे नाहीं कां कीं, आपल्या सभोंवार संपत्ति व सुंदर स्त्रियांचे सौंदर्य कितीहि हैदोस घालीत असलें तरी जे पवित्र व शुद्ध अंतःकरण असते ते त्या सभोंवतालच्या संपत्ति व सौंदर्याच्या महासागरांतील सागरांत मिळून मिसळून जात नाहीं. तेल पाण्यावर तरंगतें त्याचप्रमाणें तें अलिप्त राहील मग असें काय बरें करतां आपण?

श्री रामकृष्णानीं स्मित हास्य केलें व म्हणाले, जो निरीच्छ व निर्विकार आहे त्याचें अंतःकरण पाण्यावरील तेलाप्रमाणें तरंगत राहिल हें खरें परंतु तेल कितीहि चांगले असलें तरी तें दीर्घकाळ पाण्याच्या सहवासांत राहिल्यानें तें अशुद्ध बनून त्याला दुर्गंध येऊं लागतो!

× × ×

**शहाण्याचें कर्तव्य**

होय; हें खरें आहे कीं, शुद्ध अंतःकरण हें महान शक्तिशाली असतें. तें सभोंवारच्या कोणत्याही धोक्यापासून स्वतःचें संरक्षण करूं शकतें. सहजासहजीं तें कोणत्याही जाळ्यात अडकणार नाहीं; परंतु अपायकारक गोष्टीशीं दीर्घकाळ संबंध ठेवणें अनिष्ट असतें. तशा स्थितींत शहाण्या सुरत्याचें अंतःकरणही बावरून गेल्याशिवाय रहाणार नाहीं. अंतःकरणाची गुंतागुंत झाल्यानें ज्याच्यापासून अपाय होण्याचा संभव अशा गोष्टीपासून दोन पावलें दूर रहाणें हेंच शहाणपणाचें लक्षण आहे. तसें न करतां एखादा मनुष्य त्या गोष्टीशीं सामना करूं लागला व हळु हळु तिच्या आहारीं जाऊं लागला मग तें आहारीं जाणें स्वतःची कसोटी पहाण्यासाठीं असेना का; एक दिवस तो त्यांतच बुडून गेल्याशिवाय रहाणार नाहीं.

---

# श्रीगुरुग्रंथांतील नामदेवाची वाणी

अनुवादक : **गणेश विष्णु कवीटकर**, एम. ए.

: ७ :

देवा ! तुम्ही मला जर राज्य दिलें तर मोठेपणा कसला ? आणि भीक मागावी लागली तर त्यांत माझी काय हानि होणार ? हें मना ! तूं एक श्रीहरीची भक्ति कर कीं तुला निर्वाणपद हें ठेवलेलेंच आहे. तुला जन्ममरणाच्या येरझाऱ्या कराव्या लागणार नाहींत. सर्व साधनें भ्रमांत टाकणारीं आहेत. ज्याला ज्ञानप्राप्ती होते, तोच देवाला ओळखूं शकतो. सद्‌गुरु भेटीनें सर्व संशय निरसन पावतात. मीं कोणाची पूजा करूं ? एका दगडाची भक्ति करावी आणि दुसऱ्या दगडावर पाय द्यावा. भक्ति केलेल्या दगडांत देव आहे, तर पाय दिलेल्या दगडांतहि देव आहे. नामदेव म्हणतात, मी सर्वरूपानें श्रीहरीची सेवा करतों.

: ८ :

हे बाई ! ज्यांच्या ठिकाणीं दोषाचा अथवा अशुद्धतेचा लवलेशहि नाहीं, जो सुगंधमय आहे असा परमेश्वर माझ्या हृदयांत वास्तव्य करून राहिलेला आहे. तो कोठून येतो ? त्याला येतांना कोणी पाहिलें आहे कां ? हें गूढ कोण उकलणार ? सर्वव्यास आणि अगम्य अशा ईश्वराचें वर्णन कोण करूं शकणार ? आणि तें कोणास समजणार ! आकाशांत फिरणाऱ्या पक्षांचा व पाण्यांत फिरणाऱ्या मत्स्यांचा ठावाठिकाण व मार्ग सांपडत नाहीं, त्याप्रमाणें तो कोठून येतो व केव्हां जातो हें सांगतां येत नाहीं. आकाशांतील मृगजळानें घट भरून ठेवण्याइतकेंच त्याचा मार्ग शोधणें दुर्घट आहे. नामदेव म्हणतात, ज्याच्या ठिकाणीं तीनहि गूण एकवटले आहेत असा माझा स्वामी श्रीविठ्ठल आहे.

: ९ :

देवा ! तुझ्या दर्शनानें गायनाची स्फूर्ति होते, धैर्य प्राप्त होतें आणि अंतर्यामी अखंड अंतरनाद ऐकूं येतो. सद्‌गुरुकृपेनें मला देवाचें दर्शन झालें आहे. जेथें झिलमिल झिलमिल अथवा लुकलुक असा दिव्य प्रकाश दिसूं लागतो ती अवस्था गुरुप्रसादानें मी अनुभविली. रत्नकमलाप्रमाणें हृदयाच्या गाभाऱ्यांत विद्युत् प्रकाश चमकूं लागला. परमेश्वर जवळहि नाहीं आणि दूरहि नाहीं. तो माझ्या अंतःकरणांत आत्मरूपानें पूर्ण भरलेला आहे. त्याठिकाणीं सूर्य उदयास येतांच इतर सर्व दिव्यांचा प्रकाश

तुच्छ वाटूं लागतो. नामदेव म्हणतात, श्रीगुरुप्रसादानें हें सर्व मला कळून आलें आणि ईश्वर स्वरूपांत मी सहज सामावून गेलों.

: १० :

शेजारणीनें नामदेवांना विचारलें, 'तुझी झोंपडी कोणत्या कारागिरानें दुरुस्त केली हें मला सांगशील कां? त्याला आम्ही दुप्पट मजुरी देऊं.' नामदेवानें उत्तर दिलें, 'हे बाई! माझा कारागीर तुला देतां येणार नाहीं. हे पहा, माझा कारागीर सर्वत्र व्यापून राहिला आहे, तो माझ्या प्राणाचा आधार आहे. ज्या कोणास झोपडी बांधून पाहिजे असेल त्याला तो प्रेमाची मजुरी मागेल. जन, कुटुंब या सर्वांचा त्याग करून त्याची भक्ति करावी तेव्हां तो आपोआपच वश होतो. माझ्या कारागिराचें वर्णन मी करूं शकत नाहीं. तो सर्वांच्या हृदयांत आहे. अमृतरस चाखलेल्या मुक्याला जसें अमृताच्या गोडीचें वर्णन करतां येत नाहीं, त्याप्रमाणें माझी अवस्था झाली आहे. हे बाई, माझ्या कारागिराचें गुण ऐक. त्यानें सागराला बंधन घातलें आहे, ध्रुवाला अढळ स्थान दिलें, रामाला सीता परत आणून दिली आणि बिभीषणाला लंकेचें राज्य दिलें; असा हा नामदेवाचा स्वामी आहे.

—:×:—

## साई निकेतनमध्यें भजनाचा कार्यक्रम

श्रीरामनवमीच्या दिवशीं श्रीसाईबाबा शिरडी संस्थानच्या मुंबई येथील कचेरींत अर्थात् साई-निकेतन, दादर येथें सुप्रसिद्ध हनुमान भजन मंडळीचें सुश्राव्य भजन सकाळीं १० ते दुपारीं १॥ वाजेपर्यंत झालें. भजनांत मुख्यतः श्रीरामाचीं व श्रीसाई-बाबांचीं भजनें म्हणण्यांत आलीं. कार्यक्रम ठीक झाला.


# लहान मुलाच्या आंकडीवर

## जुनें आणि प्रसिद्ध औषध

## जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाला वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# आमची दैनंदिन वागणूक

**************●**************

**आम्हीं लहानसहान गोष्टीतही एकमेकांशीं रोजच्या व्यवहारांत कसे वागतों त्यावरून आमची माणुसकी समजून येण्यासारखी असते. माणुसकी म्हणजे देवत्व. आजकाल त्याच गोष्टीला आपण पारखे होऊन राहिलों आहोत. माणुसकीच्या अभावीं बाहेरची युद्धें आणि घडामोडी कशाला ? आपल्या घरांतच काय चाललें आहे तें पहा !**

## सर्वत्र स्वार्थ बोकाळला आहे

आज काल माणसांनीं माणुसकी सोडलेली दिसून येत आहे. कुठेंही जा, एकमेकां-बद्दल सहानुभूति व बंधूभाव तुम्हाला आढळून येणार नाहीं. स्वार्थ सर्वत्र बोकाळलेला आहे. न्याय बुद्धि नाहीं, प्रेमभाव नाहीं; सत्याची चाड नाहीं. स्वतःच्या क्षणिक लाभासाठीं वाटेल तें करण्याची आमची तयारी !

आम्हीं आमच्या विकासाकडे मुळींच लक्ष देत नाहीं; मग दुसऱ्याच्या विकासाची आम्हीं काय बरें काळजी बाळगणार ? ज्या ज्या उपायांनीं आपला विकास होईल त्या त्या उपायांचा आम्हीं अवलंब केला पाहिजे. 'माणुसकी' या एका गुणांत कितीतरी सग्दुणांचा समावेश होतो. जे केवळ पशूंना शोभा देणारे गुण आहेत त्यांचा आम्हीं त्याग केला पाहिजे; परंतु तसे करण्याऐवजी त्याच दुर्गुणांचें आमच्याकडून नित्य आचरण होत असतें. आमच्या अंगी माणुसकी बाणल्याशिपाय देवत्वाकडे जाण्याचा मार्ग मोकळा होणार नाहीं. माणुसकी हाच देवाकडे जाण्याचा, देवाला आपल्याजवळ आणण्याचा राजमार्ग आहे याची आम्ही खूणगांठ बांधून ठेविली पाहिजे.

## बंधूभावानें वागण्याची जरूरी

आपल्यामध्यें, आमच्या कुटुंबियामध्यें व ज्या समाजांत आम्ही सदासर्वकाळ वावरतों त्या समाजामध्यें स्वार्थ आपलपोटेपणा, द्वेष, मत्सर बोकाळलेला आहे. त्यांची हकालपट्टी करण्यासाठीं आम्हीं झटलें पाहिजे. जेणें करून आमच्यांत बंधुभाव परस्पर प्रेम सेवा भाव जागृत होईल अशा कार्यांत आम्ही स्वतःला गुंतवून घेतलें पाहिजे व इतरांनाही तशा कार्यांत सामील करून घेतलें पाहिजे. कारण हाच आपल्या व इतरांच्या उन्नतीच्या मार्ग आहे. एकमेकांशीं फटकून वागणें, दुसऱ्याच्या अडचणींची व दुःखाची पर्वा न करणें, बेपर्वाईनें वागणें या गोष्टी माणुसकीच्या विरुद्ध आहेत. कोणीहि हलका किंवा हीन नाहीं. देवाच्या दरबारीं सर्व सारखे तोच आम्हांला जन्म देणारा, तोच आमच्या पिता त्याला सर्व

लेकरें सारखीं वाटतात. त्याचप्रमाणें आमचें एकमेकांशीं बंधुत्वाचें नातें आहे, आम्हीं एकमेकांच्या उपयोगी पडणें हेंच आमचें पवित्र कर्तव्य आहे, यांची जाणीव आम्हीं अहर्निश बाळगली पाहिजे.

### पशुवृत्तीचा त्याग

पर दुःख शीतल असें मानून आम्हीं स्वस्थ रहातां कामा नये. दुसऱ्यांचें दुःखानें आम्हांला दुःख झालें पाहिजे. दुसऱ्यांचें दुःख तें आपलेंच दुःख या भावनेनें आम्हीं वागलें पाहिजे. एखाद्या असहाय्य व गरीब माणसावर कोणत्याही प्रकारचें दुःख ओढवो त्याच्यावर कोणींही अत्याचार करो. तेथें त्याचें आणि माझें दुःख हा भेदभाव न बाळगतां आम्हांला धांवत जाण्याची बुद्धि झाली पाहिजे एखाद्या असहाय्य विधवेवरील दुर्धर प्रसंग तोच आपल्या वरील प्रसंग असें वाटलें पाहिजे. तो कोणी दुःखानें रडत आहे. रडेना का! मला काय त्याचें? ही झाली पशुवृत्ति. तिचा आम्हीं त्याग केला पाहिजे.

इतरांबद्दल आमच्या अंतःकरणांत अशुभ भावना केव्हांही येऊं नयेत. मी सुखी व्हावें माझें सर्व तो परी कल्याण व्हावें; आणि इतरांचें? इतरांचें तळपट होईना का? तें अवश्य व्हावें! ही का माणुसकी झाली?

### लहानसहान गोष्टींतही माणुसकी

दुसऱ्याला त्रास होईल अशी वागणूक आमच्याकडून केव्हांही होऊं नये दुसऱ्यावर जुलून करणें दुसऱ्याला धोका देणें, त्याची कोणत्याही बाबतींत फसवणूक करणें, त्याच्याशीं बेईमानीनें वागणें ही का माणुसकी झाली? यापैकीं कोणतीही अनुचीत गोष्ट आपल्याकडून घडणार नाहीं व अशारीतीनें आपल्याकडून माणुसकीचा खून घडणार नाहीं, याबद्दल आम्हीं दक्षता बाळगली पाहिजे. माणुसकी केवळ मोठ्या गोष्टींत असते असें नाहीं. लहानसहान गोष्टींतही माणुसकी दिसून येत असते.

आमचें एकमेकांशीं वागणें प्रेमाचें सचोटीचें व सहानुभूतीचें असावें. आंत एक व बाहेर एक असें नसावें. सभोंवार जरा डोळे उघडून तर पहा! काय काय अत्याचार एक माणूस दुसऱ्यावर करीत आहे! माणूस हा माणूस केव्हां बनतो? माणुसकीनें प्रेमानें व शुद्ध भावनेनें एकमेकांशीं वागेल तेव्हां. अशा रीतीनें सदैव वागणारा मानव हाच एक दिवस देवत्त्व संपादन करीत असतो. माणसानें माणसाप्रमाणें वागून याच जन्मीं देव बनावयाचें आहे. माणसानें माणूस बनावयाचें कीं पशू अथवा राक्षस बनावयाचें ही किमया आपल्याच हातीं आहे. तुम्हीं जसे वागाल, जसा व्यवहार कराल तसे तुम्हीं बनाल याच देहीं याच डोळा तुम्हीं देवत्त्वाप्रत जाऊं शकतां! परंतु हें तुमच्या वागण्यावर अवलंबून आहे.

## सत्संगाचा महिमा

सत्संगाचा महिमा फार मोठा आहे. त्यामुळें आपल्या मनावर सुसंस्कार घडतात आपल्या वागण्यांत बदल होऊं शकतो नेहमीं गुणी माणसांच्या सहवासांत रहाण्याचा प्रयत्न करावा. अपरोक्षपणें गुणी माणसांचा प्रभाव आपल्यावर पडल्याशिवाय रहात नाहीं.

गुणग्राहता हा एक मोठा गुण आहे. स्वतःच्या अंगीं कांहींना कांहीं गुण असल्या-शिवाय दुसऱ्यांच्यां गुणांची वाहवा करावी असें वाटणार नाहीं. गुणी जनांची पारख गुणी माणसानें करावी. दुसऱ्यांचे गुण असेनात कां; त्यांची आपण कदर केली पाहिजे. प्रशंसा केली पाहिजे. त्यामुळें परस्परांत बंधूभाव मैत्री व सौहार्द उत्पन्न होत असतें या जगांत सारे आपले मित्र व बंधू आहेत ते तसे आपण राखले पाहिजेत. शत्रुत्व निर्माण करणें हें महापाप आहे.

## श्रद्धेचें महत्त्व

प्रत्येकानें श्रद्धाशील बनलें पाहिजे. श्रद्धा हें जीवनांतील अमृत आहे. जेथें श्रद्धा नाहीं तेथें सारें शुष्क होऊन राहिलेलें असतें. आपले गुरुजन, वाडवडील साधुसंत व भगवंत यांच्यावर आपली श्रद्धा असणें जरूर आहे. श्रद्धा ही मारक नाहीं तर तारक आहे.

भगवंतावर श्रद्धा ही असलीच पाहिजे. तोच कर्ता करविता, हालविता बोलविता व चालविता. त्याच्या नांवानें आम्हीं प्रत्येक कार्याला हात घालावयाचा व तें कार्य पार पाडावयाचें. ईश्वर आमच्या अंतर्यामीं आहे तसाच तो सर्वांठायीं आहे या श्रद्धेनें आम्हीं एकमेकांशीं प्रेमाच्या आदराच्या भावनेनें वागलें पाहिजे; म्हणजे या जगांत आम्हांला कांहींही उणें पडणार नाहीं.

---

# वर्गणीदारांस विनंति

ज्याची वर्गणी मार्च अखेर संपली आहे अशा श्री साई लिलेच्या वर्गणीदारांनीं आपली वर्गणी ५ रु. कृपा करून १५ मे च्या आंत पाठवून उपकृत करावें अशी विनंती आहे. पुन्हां आठवण करून देण्याची जरूरी भासणार नाहीं अशी आशा आहे. वर्गणी पुढील पत्त्यावर कृपा करून पाठवावी.

व्यवस्थापक —श्री साईलीला
साई निकेतन, व्हिन्सेंट रोड,
फ्लॅट नं ८०४, बी. दादर,
मुंबई नं. १४.

१५५

पोंच व अभिप्राय—

## श्री दत्तभक्ति दर्शन

श्री दत्तभक्ति दर्शन—संपादक व प्रकाशक—अनंत वासुदेव मराठे; वितरक—श्री समर्थ ग्रंथ भवन, बनाम हॉल लेन, मुंबई नं. ४. किंमत ५० नये पैसे.

श्री दत्तभक्तीचें महात्म्य महाराष्ट्रांत घरोघर आहे. प्रस्तुक पुस्तिका श्री. मराठे यांनीं दत्तभक्तांसाठीं खास तयार केली असून त्यांत श्री दत्त अवताराचें वैशिष्ट्य, श्री दत्तसांप्रदायाचें वैशिष्ट्य, श्री दत्तप्रतिक, कांहीं दत्त स्थानें, दत्तभक्तांची परंपरा, संत चरित्रांतील चमत्कार, श्री दत्तासंबंधीं पदांचा संग्रह, श्री दत्ताच्या आरत्या, भजनें वगैरे छोटीं छोटीं १६ प्रकरणें आहेत. दत्तभक्तांना तीं आवडल्याशिवाय रहाणार नाहींत.

श्री दत्तभक्त व श्री गजानन महाराज बोरकर यांचे पट्टशिष्य श्री. अवधूतस्वामी लिमये, बी. ए. यांना ही पुस्तिका अर्पण करण्यांत आली असून त्यांच्याच हस्तें तिचें समारंभपूर्वक प्रकाशन गेल्या अक्षय्यतृतियेच्या सुमुहूर्तावर झालें. श्रीदत्त महाराजांच्या अवतार कार्यावर मोठमोठाले ग्रंथ प्रसिद्ध झालेले असले तरी वेळेच्या व किंमतीच्या दृष्टीनें सर्वसाधारण भक्तांस ते परवडण्यासारखे नसतात. त्या दृष्टीनें या पुस्तिकेचें महत्त्व आहे.

---

## मनोविजय

लेखक : श्री. **मोरेश्वर वासुदेव लिमये** बी. ए. उर्फ **अवधूतस्वामी** नावलकर बिल्डिंग तिसरा मजला, एन्. सी. केळकर रोड, दादर मुंबई २८, मूल्य पांच रुपये. श्री समर्थ रामदास स्वामी यांचे 'मनाचे श्लोक' सुप्रसिद्ध व लहानापासून थोरांपर्यंत सर्वांना सुपरिचीत आहेत. भाषा सुलभतेमुळें बालमनावरही त्याचा ठसा उमटल्याशिवाय रहात नाहीं. मनुष्यमात्रानें कसें वागावें, जगांत कसें वावरावें व आपलें जीवन सुफल कसें करावें यासंबंधींचें सुंदर मार्गदर्शन त्या श्लोकाश्लोकांतून समर्थांनीं केलें आहे. त्या श्लोकांतील एकेक श्लोक घेऊन त्यावर श्री. अवधूतस्वामी यांनीं आपल्या अनुभवी अधिकारी वाणीनें अत्यंत सुबोध भाषेंत केलेलें विवरण प्रत्येक वाचकाच्या मनाचा ठाव घेतल्याशिवाय रहाणार नाहीं. श्री. अवधूतस्वामी यांचा अध्यात्माचा व्यासंग दांडगा असून त्यांची निरुपण शैली परिणामकारक आहे. लहानापासून थोरापर्यंत सर्वांना या ग्रंथ वाचनापासून फायदाच होईल.

याशिवाय लेखकानें लिहिलेली सती अनसूया ही एकांकिका व त्यानीं रचिलेले भक्ति रसपूर्ण असे कांहीं अभंगही शेवटीं जोडण्यांत आले आहेत. छपाई अंतरंग व बाह्यांग ( कापडी बांधणी ) सुंदर आहे. श्री अवधूतस्वामी यांच्या हातून अशीच आबालवृद्धांना मार्गदर्शक होणारी ग्रंथसंपत्ति निर्माण होवो.

---




## मार्च १९६१

**या** महिन्यांत बाहेरगांवची भक्त मंडळी श्रीसाईंचे दर्शनास बऱ्याच मोठ्या संख्येनें आली होती. कांहीं कलाकारांनीं श्रीचे पुढें हजेरी दिली, ती खालीलप्रमाणें:–

**कीर्तनः**—श्री. ह. भ. प. तुकारामबुवा आजेगांवकर मु. आजेगांव ता. हिंगोली जि. परभणी ( म. वा. ) श्री. ह. भ. प. अनंतराव दामोदर आठवले, आयुर्वेदतज्ञ, पुणें श्री. मराठे गवई ( शिर्डी संस्थान ) श्री. तुकाराम बीज, श्री. एकनाथ शष्टी, गुढीपाडवा नववर्षारंभ दोन एकादशा अशीं ५ कीर्तनें झालीं.

**गायनः**—श्री. गणपतराव देवासकर, मुंबई; श्री. पंडित जगन्नाथ महाराज, सुरतकर मु. साकोरी, श्री. पिरोजबाई दस्तुर. मुंबई, श्री. मेनका शिरोडकर पुणें, श्री. एच. के. वकील–माहीम, श्री. ओं, शरण ब्रह्मचारी दिल्ली, सौ. सुनंदा भालचंद्र देशमुख मुंबई, श्री. अनंत नारायण लाड दादर मुंबई, श्री. रमाकांत अबा नारवे पुणें, श्री. भगवंत गोविंद माळगी, पुणें, श्री. नारायण बापू गरवारे, पंढरपूर.

**नृत्यः**—कु. उमाशंकर, मुंबई.

**तबला वादनः**—श्री. पी. एस. मणी, श्री. वसंतराव शिरोडकर पुणें, श्री. दत्तोबा गुरव, जळगांव, श्री. गुरुदत्त साकोरी, श्री. भालचंद्र देशमुख, मुंबई.

**हार्मोनियम वादनः**—श्री. एकनाथ काशिनाथ चव्हाण, पुणें.

**तंतुवाद्य :**—श्री. डी. एस–कुर्लेकर, माहीम मुंबई. ( बाजी. श्री. पी. के. एस. मणी मुंबई.

**रंगपंचमी व गुढीपाडवा** या दिवशी श्रीचे रथाची मिरवणुक गांवांतून सालाबादप्रमाणें काढण्यात आली होती. दोन्ही मिरवणुकी सायंकाळचे सुमारास काढण्यात आल्या होत्या. गुढीपाडव्याचे दिवशीं श्रींचे कळसावर ( गुढी ) पूजा करून बांधण्यांत आली होती रात्रौ विजेच्या दिव्यांची रोषनाई कळसावर व इतर ठिकाणीं केली होती. रात्रौ नवीन वर्षारंभानिमित्त कीर्तन गायन कार्यक्रम झाला.

ता. ३०।३।६१ गुरुवार रोजी साईसंस्थानचे व्यवस्थापक अधिकारी श्री. शेटेसाहेब हे एकाएकी पेरेलेसचे आजाराने प्रकृति बिघाड होऊन अहमदनगरचे हॉसीटलमध्यें त्यांना ठेवले आहे. शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

———

# शिरडीस जाणाऱ्या साईभक्तांस सूचना

१ शिरडीस पोहोचल्यानंतर चौकशी-ऑफिसांत खोलीबद्दल तपास करा.

२ खोलींत सामान ठेवून कुलूप लावल्याशिवाय कोठेही बाहेर जाऊं नका.

३ सार्वजनीक हॉटेलमध्यें जागा मिळाली तर, तुमचें सामान चीजवस्तु संभाळण्याची काळजी घ्या. सामानाजवळ आपला एक माणूस बसवून मगच इतरत्र जा. चोर मागावर असतात.

४ स्नानगृहांतून बाहेर येतांना पैशाचें पाकीट, दागिने, हातांतील घड्याळ, कपडे, भांडी वगैरे घेण्यास विसरूं नका. अलिकडे लॉकर्सची सोय करण्यांत आली आहेच. तिचा जरूर फायदा घ्या.

५ अंगावर दागिने असल्यास आपल्या लहान मुलांना एकटे सोडूं नका.

६ श्रींचे आरतीचें वेळीं धक्काबुक्की होते. त्यावेळीं आपल्या मुलांना सांभाळा व आपल्या खिसा पाकिटावर लक्ष ठेवा.

७ श्रींचे ऑफिसशिवाय कोणत्याहि इतर ठिकाणीं अगर कोणाच्या हातांत पैसे देऊ नका. धर्म कृत्य फक्त संस्थेमार्फत करावे.

८ श्रींचें ऑफिसांत धर्मकृत्याबद्दल पैसे दिले, तर त्याची पावती मागून घ्या.

९ श्रीसाईबाबा संस्थानचा, इतर ठिकाणीं श्रीसाईबाबांचे नांवावर चाललेल्या संस्थांशीं कांहींहि संबंध नाहीं.

१० श्रींचा कोणी शिष्य नाहीं, अगर वारसदार गादीवर बसलेला नाहीं. अगर मध्यस्ती नाहीं. नुसत्या श्रींच्या पेहेरावासारखे पेहराव केलेल्या माणसावर विश्वास ठेवून फसूं नका.

११ मार्गदर्शकाचें सोंग करून कांहीं अपरिचित माणसें, शिरडीची स्थळें दाखविण्यासाठीं ओळख करून घेतात. अशा माणसांवर विश्वास ठेवूं नका.

१२ श्रींचे नांवावर कांहीं माणसें जंतर मंतर, धागादोरा करणारे मांत्रिक तांत्रिक म्हणून फिरत असतात. त्यांचेपासून सावध रहा.

१३ श्रींचे नांवावर चालू असलेल्या सांखळी पत्रास महत्त्व देऊं नका.

१४ श्रींचे बाबतींत आधारभूत माहिती, ऑफिसांत विचारावी, इतरांवर विश्वास ठेवूं नका.

१५ आपली कांहीं तक्रार असल्यास, मुद्दाम सोईसाठीं ठेवलेल्या नोंद पुस्तकांत, आपली तक्रार नोंदावी. आपलें पूर्ण नांव व पूर्ण पत्ता नोंदाविण्यास विसरूं नका. शक्य झाल्यास तक्रारींची एक प्रत मुंबई कचेरीकडे पाठवावी.




तारेचा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनींयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं चालविलेलें एकमेव ठिकाण.

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांसाठीं खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा :—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद ३. [ आंध्र प्रदेश ]**


